




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ००६ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# चक्क भाजप, काँग्रेस एकत्र

## दोन्ही शिवसेनेची 'महायुती', गडहिंग्लजमध्ये मुश्रीफांविरोधात सर्व पक्षांची आघाडी

**कोल्हापूर : (समर्थ गांवकरी)**

गडहिंग्लज नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना थोपवण्यासाठी जनता दल, भाजप, काँग्रेस, उद्धव ठाकरे शिवसेना, एकनाथ शिंदे शिवसेना, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस, जनसुराज्य शक्ती असे सारेच पक्ष एकत्र आले आहेत. 'व्यक्ती विरोधातील लढा' असे गडहिंग्लजच्या गडाच्या लढतीला स्वरूप आले आहे. विशेष म्हणजे येथे राजकीय विचारांना तिलांजली देत समीकरणे घडू लागली



आहेत. गडहिंग्लज हा जनता दलाचा राज्यातील एकमेव उरलेला गड अशी स्थिती आहे. येथे जनता दलाचे दिवंगत प्रदेशाध्यक्ष, माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांची कन्या स्वाती कोरी यांनी जनता दलाचे ढासळते बुरुज टिकवून ठेवले आहेत. यामुळे येथे कोरी यांच्याशी हातमिळवणी करण्यासाठी सर्व पक्ष उत्सुक आहेत. त्याला कारण ठरले आहे ते वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना येथे रोखणे. गडहिंग्लज नगरपालिकेसाठी अनुसूचित जमातीकरिता नगराध्यक्ष पदाचे आरक्षण आहे. त्यामुळे येथे सक्षम उमेदवाराचा शोध घेतला जात आहे. गडहिंग्लज पालिका ही मुश्रीफ यांच्या कागल विधानसभा मतदारसंघातील सर्वांत मोठी पालिका. मुश्रीफ यांना येथे पालिका निवडणुकीत आवर घातला, की पुढे विधानसभा निवडणुकीत त्यांच्या मार्गात काटे पेरणे सोपे जाणार असल्याची अटकळ त्यांच्या तमाम विरोधकांनी बांधली आहे. त्यातूनच गडहिंग्लज या राजकीय प्रयोगाची पहिली रंगभूमी ठरली आहे. हसन मुश्रीफ यांनी चंदगड नगरपालिका निवडणुकीत शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस व अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही टोकाचे पक्ष एकत्रित आणले. या चालीस मात देण्यासाठी म्हणून गडहिंग्लजमध्ये घडामोडी घडत आहेत. चंदगडचे भाजपसमर्थक आमदार शिवाजी पाटील लगेचच गडहिंग्लजमध्ये डेरेदाखल झाले. त्यांनी स्वाती कोरी यांना भाजपचे पाठबळ दर्शवले.

## महाराष्ट्रात थंडीचा कडाका कायम



मुंबई : महाराष्ट्रात या आठवड्याच्या सुरुवातीपासूनच थंडी अनुभवायला मिळत आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा परिणाम राज्याच जाणवू लागला आहे. प्रामुख्याने विदर्भात किमान तापमानाचा पारा १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाला आहे. विदर्भासह उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तापमान कमी झाले आहे.


## आता बोला...




# संगमनेरच्या साकुर पठार भागातील ६ उपसा सिंचन योजनांसाठी सर्वेक्षण

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

उपसा सिंचन योजना कार्यान्वित करून साकूर पठार भागातल्या १४ गावातील शेतकऱ्यांना पाणी देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. सर्वेक्षणाबरोबरच योजनेच्या पूर्ततेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, वर्षानुवर्षे दुष्काळाचे संकट पाहिलेल्या साकूर पठार भागात नवे पर्व निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याची ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली. साकूर पठार भागातील १४ गावांकरिता असलेल्या सहा उपसा सिंचन योजनेचे हस्तांतरण जलसंधारण विभागाकडून



जलसंपदा विभागाकडे करण्यात आले आहे. योजनांच्या कामासाठी जलसंपदा विभागाने सर्वेक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर मंत्री विखे पाटील यांनी आज, शुक्रवारी या भागाची संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली. या प्रसंगी शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, की वर्षानुवर्षे या भागाला पाणी मिळाले नाही. मात्र, आमदार अमोल खताळ यांच्या पाठपुराव्यातून पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटण्यास मदत झाली आहे. सहा गावांच्या उपसा सिंचन योजनेबरोबर अन्य आठ गावांचा समावेश यामध्ये करण्याच्या सूचना आपण अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून जिल्ह्यातील धरणामध्ये अधिकचे पाणी आणण्यासाठी जलसंपदा विभागाचे काम सुरू झाले आहे. मुळा धरणात १५ टीएमसी पाणी अधिकचे निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## मतचोरीच्या आरोपांना धोबीपछाड – राधाकृष्ण विखे

भाजप आणि मित्र पक्षांच्या युतीला बिहारमध्ये मिळालेला ऐतिहासिक विजय पाहता विरोधकांच्या 'फेक नॅरेटिव्ह'ला जनता थारा देत नाही हेच सिद्ध झाले आहे. मतचोरीचा आरोप करणाऱ्यांना या निवडणुकीने नाकारले आहे. संविधानिक संस्थांवर आरोप करण्यात आले. आपल्या राज्यातील जाणता राजासह काही नेते त्यात सहभागी झाले. तेथेही काँग्रेस पक्षाची वाताहत पाहता राहुल गांधींनी आता परदेशात जाऊन देशाच्या लोकशाही व्यवस्थेवर टीका करण्यापेक्षा स्वतःच्या पक्षाच्या अस्तित्वासाठी काम करावे असा टोला पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी मारला.

अतिवृष्टीची मदत म्हणून ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज सरकारने घोषित केले. तालुक्यातील युवकांच्या रोजगारासाठी औद्योगिक वसाहतीकरिता आ. खताळ यांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना माझे संपूर्ण सहकार्य असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार खताळ म्हणाले, की एक वर्षापूर्वी दिलेल्या शब्दाची पूर्तता होत असल्याचा आनंद असून, महायुती सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत आहे. मात्र, दुसरेच लोक श्रेय घेत आहेत. औद्योगिक वसाहत साकूर भागातच होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

# जैन बोर्डिंगचे खरेदी खत रद्द, न्यायालयाचा आदेश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शेठ हिराचंद नेमचंद दिगंबर जैन बोर्डिंगच्या जागेचे वादग्रस्त खरेदी खत रद्द करण्याचे आदेश दिवाणी न्यायाधीश एन. आर. गजभिये यांनी शुक्रवारी दिले. त्यानंतर जैन बोर्डिंगची तीन एकर जागा विकण्याबाबत शेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्ट आणि बांधकाम व्यावसायिक कंपनीत नोंदविलेला खरेदी दस्त कायदेशीरदृष्ट्या रद्दबातल झाला आहे.

ट्रस्ट आणि विकसकांमध्ये जैन बोर्डिंगच्या जागेच्या विक्री व्यवहाराला धर्मादाय आयुक्तांनी ४ एप्रिल रोजी मंजुरी दिली होती. त्यानंतर या व्यवहाराच्या विरोधात जैन समाजाने विरोध दर्शविला. आचार्य गुप्तीनंद महाराजांच्या नेतृत्वाखाली जैन बोर्डिंग बचाव कृती समितीने आंदोलन केले. त्यामुळे बांधकाम व्यावसायिक कंपनीने या व्यवहारातून माघार घेतली. त्यानंतर ट्रस्ट आणि विकसकाने धर्मादाय आयुक्तांसमोर संयुक्त प्रतिज्ञापत्र सादर करून हा व्यवहार रद्द करण्यास हरकत नसल्याचे सांगितले. त्याआधारे



धर्मादाय आयुक्तांनी या जागेच्या विक्री व्यवहाराला दिलेली मंजुरी रद्द केली. त्यावेळी ट्रस्ट आणि विकसकाने जागेचे खरेदी खत रद्द करण्याबाबत कायदेशीर पावले उचलण्याचे निर्देश धर्मादाय आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार ट्रस्ट आणि विकसकाने शिवाजीनगर दिवाणी न्यायालयात खरेदी खत रद्द करण्याबाबत अर्ज दाखल केला

'दिवाणी न्यायाधीश एन. आर. गजभिये यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. हे खरेदी खत रद्दबातल करण्याचे आदेश देण्यात आले', अशी माहिती अॅड. योगेश पांडे यांनी दिली. ट्रस्टकडून अॅड. इशान कोल्हटकर, विकसक बांधकाम व्यावसायिक कंपनीकडून अॅड. निश्चल आनंद, तसेच जैन बोर्डिंग बचाव कृती समितीकडून अॅड. अनिल पटणी, अॅड. सुकौशल जिंतूरकर, अॅड. योगेश पांडे, अॅड. आशिष पटणी यांनी काम पाहिले.

जैन बोर्डिंग विक्री प्रकरणाला स्थगिती देण्याचे आदेश धर्मादाय आयुक्तांनी यापूर्वी दिला होता. जैन बोर्डिंगच्या भूमी विक्रीसंदर्भात दाखल याचिकेवर धर्मदाय आयुक्त अमोघ कालोटी यांच्या अध्यक्षतेखाली अतितातडीची सुनावणी झाली. संस्थेच्या मूळ धर्मदाय उद्देशाचे रक्षण करण्यासाठी स्टेटस को आदेश मागविण्यात आला होता. याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. योगेश पांडे यांनी युक्तिवाद केला होता. जैन बोर्डिंग ही संस्था विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि निवासासाठी स्थापन झाली आहे. संस्थेच्या मालमत्तेचा पुनर्विकास वा विक्री हा मूळ हेतूविरुद्ध असून धर्मदाय कायद्याच्या विरोधात आहे.

व्यवहार करताना धर्मदाय कार्यालयाकडे परवानगी मागत असताना माहिती लपवण्यात आली. त्यामुळे सध्याची स्थिती कायम ठेवणे आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याची बाब पांडे यांनी युक्तिवादात निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर धर्मदाय आयुक्तांनी या सर्व मुद्द्यांवर सखोल चौकशी करण्याचे आणि त्याचा सविस्तर अहवाल कार्यालयात सादर करण्याचे आदेशही दिले होते.



## साताऱ्यात नगरसेवकपदासाठी ४० तर नगराध्यक्षासाठी ४ अर्ज

**सातारा : (समर्थ गांवकरी)**

सातारा पालिकेत खासदार उदयनराजे समर्थक वसंत लेवे, शंकर माळवदे, अभिजित बिचुकलेंसह जिल्ह्यातील नऊ पालिका व एका नगरपंचायतींच्या निवडणुकीत नगरसेवक पदासाठी ४० व नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवारी अर्ज दाखल झालेत. नगराध्यक्षपदासाठी चार उमेदवारांनी अर्ज दाखल करून निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकला आहे.

# मुंबई महापालिकेवर डाका टाकणारे हे डाकू : अमित साटम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बिहारमधील विधानसभा विजयानंतर भाजप नेत्यांचा आत्मविश्वास दुणावला असून आता मिशन मुंबई म्हणत भाजपने महापालिका निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. बिहार विधानसभा ट्रेलर, मुंबई महापालिका खरा पिच्चर, असे म्हणत मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी भाजपचे रणशिंग फुंकले आहे. यावेळी, त्यांनी ठाकरे बंधू एकत्र येण्यावरुनही त्यांनी जोरदार टीका केली. मुंबईकरांच्या खिशावर डल्ला मारणारे, संपत्ती लुटणारे, मुंबईकरांवरती डाका टाकणारे हे डाकू आहे, मुंबई महापालिकेवर 25 वर्षांपासून ज्यांनी राज्य केलं, ते डाकू आहेत, असे म्हणत नाव न घेता साटम यांनी ठाकरेंवर हल्लाबोल केला. बिहारच्या ऐतिहासिक विजयाच्या खूप खूप शुभेच्छा, विरोधकांनी रडीचा डाव मांडला होता. आम्ही जिंकलो तर लोकशाही आणि हरलो तर व्होटचोरी असं विरोधक म्हणतात. पण, आम्ही मोदींना साथ देतोय,आणि देत राहू. राहुल गांधी बाहेर जातात तिकडे काय करतात? बिहारने सांगितलं देशाचा पप्पू कोण आहे, तर राहुल गांधी आहेत. महाराष्ट्राचा पप्पू कोण हे वेगळं सांगायला नको, येत्या दोन महिन्यात महाराष्ट्राच्या पप्पूला धडा शिकवू, असे म्हणत अमित साटम यांनी नाव न घेता थेट आमदार आदित्य ठाकरेंवर हल्लाबोल केला. तसेच, मुंबईकरांच्या खिशावर डल्ला मारणारे, संपत्ती लुटणारे, मुंबईकरांवरती डाका टाकणारे हे डाकू आहे, मुंबई महापालिकेवर 25 वर्षांपासून ज्यांनी राज्य केलं, ते डाकू आहेत, असे म्हणत नाव न घेता साटम यांनी ठाकरेंवर हल्लाबोल केला. मुंबई महापालिका ही कोणत्या परिवाराची जहागीर नाही. मुंबईची महापालिका तुमच्या घरात काय घडतेय यासाठी नाही, हे मुंबईचे डाकू आहेत, अशा शब्दात अमित साटम यांनी महापालिका निवडणुकांपूर्वीच ठाकरे बंधूंवर हल्लाबोल केलाय. बिहारमध्ये अनेक वर्षांपासून एनडीएनने विकास केला आहे, बिहार हे बिमारू राज्य होते, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात राज्याचा विकास झालाय.

# 'एआय'मुळे शिक्षण क्षेत्राला नवा दृष्टिकोन – शरद पवार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अनेक क्षेत्रांत परिवर्तन घडवते आहे. शिक्षण क्षेत्रातही या बदलाची चर्चा होत आहे. माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी 'एआय'च्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवा दृष्टिकोन निर्माण करावा, समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी निमसे यांच्यासारख्या व्यासंगी व्यक्तींनी सहकार्य करावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्था तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. माजी कुलगुरू तथा इंडियन सायन्स काँग्रेसचे माजी अध्यक्ष डॉ. सर्जेराव निमसे यांचा अमृत महोत्सवी सोहळ्यात, पत्नी सुलभा निमसे यांच्यासह शरद पवार यांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. निंबा ठाकरे होते.



यावेळी देश-परदेशातील आजी-माजी कुलगुरूंसह खासदार नीलेश लंके, राज्य सरकारच्या आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार तसेच जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. अमृत महोत्सव गौरव समिती व गणित माजी विद्यार्थी संघाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा. गणेश भगत संपादित 'कुलगुरू' व 'शिक्षण आणि विकास' या दोन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले.

# हिंजवडीत कॉल सेंटरवर पोलिसांचा छापा

## २० हार्डडिस्क, तीन लॅपटॉप जप्त, अमेरिकेतील नागरिकांची करत होते फसवणूक



**पिंपरी-चिंचवड : (समर्थ गांवकरी)**

अमेरिकेतील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दोन अनधिकृत कॉल सेंटरचा सायबर पोलीस आणि गुन्हे शाखा दोनने पर्दाफाश केला आहे. लोनसाठी क्रेडिट स्कोर चांगला करून देण्याचा बहाण्याने अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जायची. याप्रकरणी कॉल सेंटर मालक आणि मॅनेजर विरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कॉल सेंटरमधून २० हार्ड डिस्क आणि तीन लपटॉप जप्त करण्यात आले आहेत.

टेकला सोल्युशन कॉल सेंटरचा मालक धनंजय साहेबराव कासार, मॅनेजर हर्षद शंकर खामकर आणि स्काय सोल्युशनचा मालक सागर कुमार यादव, मॅनेजर आनंद पंकज सिन्हा यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. चौघांना न्यायालयाने १८ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सविस्तर माहिती अशी की, आयटी हब असलेल्या हिंजवडीतील फेज दोनमध्ये गेरा इमारतीत दोन्ही अनधिकृत कॉल सेंटर सुरू होते. ते थेट अमेरिकेतील नागरिकांशी संवाद साधायचे. अमेरिकेतील नागरिकांशी कस बोलायचं? कसा संवाद साधायचा यासाठी एक स्क्रिप्ट तयार करण्यात आली होती. तिथल्या नागरिकांचा डेटा संबंधित दोन्ही कॉल सेंटरकडे आढळून आला आहे. त्या डेटाद्वारे तिथल्या नागरिकांशी संवाद साधून लोन मिळवून देण्याच्या आमिषाने त्यांची फसवणूक केली जायची. कम्युनिटी चॉईस फायनान्सीयल कंपनीतून बोलत असल्याचं सांगून लोनसाठी क्रेडिट स्कोर सुधारून देण्यात येईल, अस अमिश दाखवून त्यांच्याकडून वेगवेगळ्या कंपनीचे कुपन घेऊन ते डॉलरमध्ये बदलून घेत. दुसऱ्या पद्धतीने देखील अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जात होती.

अमेरिकेतील मेडिकल हेल्थ डिपार्टमेंटमधून बोलत असल्याचं सांगून राउंड अप, टाल्कम पावडर, झानटॅक औषधे इत्यादी वापरतात. यामुळे काही जणांना वेगवेगळा कर्क रोग झाल्याचं पोलीस सांगतात. हेच हेरून कॉल संबंधित औषधा विरोधात कोर्टात जाऊन चांगले पैसे मिळवून देऊ अस आमिष दाखवून त्यांच्याकडून सविस्तर माहिती घेऊन ती अमेरिकेतील त्रयस्थ संस्थेला विकून त्यामाध्यमातून पैसे कमावले जात होते. अखेर या दोन्ही अनधिकृत कॉल सेंटरवर सायबर पोलीस पोलीस निरीक्षक किरण नाळे आणि गुन्हे शाखा युनिट दोन चे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या टीमने छापा टाकून रंगेहाथ पकडले. दोन्ही करवाईमध्ये २० हार्डडिस्क आणि तीन लॅपटॉप पोलिसांनी जप्त केले आहेत.

# मंजुरी झाली, कार्यवाही कधी?

## संपादकीय



मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांच्या यादीत धाराशिव जिल्ह्यात सर्वात शेवटी ब्रॉडगेज झाले. धाराशिवकरांना मुंबई खऱ्या अर्थाने जवळ झाली. धाराशिवला श्री क्षेत्र तुळजापूरमार्गे सोलापूर रेल्वे जोडणीचा प्रकल्प अनेक वर्षे विचाराधीन होता. आर्थिक तरतूद, व्यवहार्यता आणि गरज या बाबी तपासून निर्णय घेतला गेला. धाराशिव–तुळजापूर-सोलापूर या ८६ किमीच्या रेल्वेमार्गासाठी मंजुरी दिली गेली. केंद्र व राज्य सरकारने ५० टक्क्यांचा हिस्सा द्यावा, असे ठरले. राजकीय सुंदोपसुंदीत प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्याकडे लक्ष गेले नाही. केंद्र सरकारने त्यांचा हिस्सा देण्यासाठी घोषणा केली होती. सर्वेक्षणात मार्गाची लांबी चार किलोमीटरने वाढून ९० किलोमीटर झाली. सुरुवातीला ९०४ कोटी ९२ लाखांच्या प्रकल्पास मंजुरी दिली गेली. धाराशिव – तुळजापूर दरम्यान काम सुरू झाले आहे. तुळजापूर – सोलापूर दरम्यान काही ठिकाणी जमीन संपादित करणे, कायदेशीर बाबींची पूर्तता गेल्या काही महिन्यांत करण्यात आली. दरम्यान, सुरुवातीला मंजूर झालेला प्रकल्पाचा आकडा तिपटीने वाढला. त्यासाठी सुधारित प्रस्ताव राज्य सरकारने सादर करून केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे वाढीव प्रकल्प किमतीनुसार रेल्वे बोर्डाने तरतूद करावी, अशी मागणी केली. त्यानुसार रेल्वे बोर्डाने ५० टक्के तरतूद केली. राज्याच्या हिश्शाचा उर्वरित ५० टक्के वाटा देण्यात राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली. त्यानुसार तीन हजार २९५ कोटी रुपयांचा सुधारित आराखडा मंजूर झाला. या रेल्वेमार्गाचा विषय धाराशिव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सातत्याने विधिमंडळात लावून धरला होता. आता यास मंजुरी मिळाल्याने श्री क्षेत्र तुळजापूर राष्ट्रीय नकाशावर झळकण्याचा मार्ग सुकर झाला आहे. या प्रस्तावातील तरतुदींनुसार धाराशिव रेल्वे स्थानक पूर्वी प्रस्तावित होते, त्याच्या तिप्पट मोठे होणार आहे. पर्यायी रेल्वे मार्ग उभारले जातील, प्रवाशांसह कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी अद्ययावत सोयी सुविधा निर्माण तर होतीलच, पण पुलांची संख्याही वाढवली जाईल, जेणेकरून दळणवळणाची



अडचण बऱ्यापैकी दूर होईल. सोलापूर शहरात रेल्वेमार्गासाठी जमीन संपादित करावी लागणार आहे. त्यासाठी प्रचलित दर गृहित धरण्यात येतील; ज्यामुळे जमीन संपादनाचा तिढा सुटण्यास मदत होईल. धाराशिवमधील मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत पूर्वी प्रस्तावित चार हजार चौरस मीटरऐवजी १२ हजार ६३० चौरस मीटर प्रस्तावित करण्यात आली. या मार्गावरून जाणाऱ्या जलदगती गाड्यांना स्वतंत्र मार्गाची पर्यायी व्यवस्था, यार्डाच्या आवश्यकतेनुसार लूपलाइन टाकली जाईल. मागच्या प्रस्ताव रस्त्याखालून जाणाऱ्या पुलांची संख्या २० होती आता ती ३१ होईल.

सोलापूर – धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पुलाची लांबीही वाढविण्यात येणार आहे. प्रवाशांसाठी सुविधा, रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची संख्या ३४२ वरून ३७३ प्रस्तावित करण्यात आली आहे. मंजूर झालेला प्रस्ताव चांगला वाटत असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, याबाबत अजूनही अनिश्चितता आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 7 | | 5 | | | | 2 |
| | 2 | 1 | 4 | 9 | | | 3 | |
| | | 4 | | 8 | | | | |
| | 5 | | 8 | 1 | | | | 9 |
| 3 | 7 | 6 | | | | 2 | 1 | 8 |
| 1 | | | | 2 | 3 | | 6 | |
| | | | | 6 | | 9 | | |
| | 8 | | | 3 | 9 | 1 | 4 | |
| 2 | | | | 7 | | 6 | 8 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 6 | 7 | 1 | 4 | 3 | 9 | 2 |
| 2 | 9 | 1 | 5 | 3 | 8 | 4 | 6 | 7 |
| 3 | 7 | 4 | 9 | 6 | 2 | 1 | 8 | 5 |
| 7 | 1 | 5 | 6 | 4 | 9 | 2 | 3 | 8 |
| 6 | 4 | 3 | 8 | 2 | 7 | 5 | 1 | 9 |
| 9 | 2 | 8 | 1 | 5 | 3 | 7 | 4 | 6 |
| 5 | 3 | 7 | 4 | 9 | 6 | 8 | 2 | 1 |
| 4 | 8 | 9 | 2 | 7 | 1 | 6 | 5 | 3 |
| 1 | 6 | 2 | 3 | 8 | 5 | 9 | 7 | 4 |

### पंचांग

१५ नोव्हेंबर २०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:एकादशी

२६:३७:३६+
नक्षत्र:उत्तराफाल्गुनी
२३:३४:१७
योग:विष्कुम्भ
(अहोरात्र)
करण:बव १३:४०:२५

## उपदेशाचे डोस

### वेळेची किंमत

एक फार मार्मिक कथा आहे. ग्रॅहम बेल यांच्या दुकानात पुस्तकाच्या दुकानात एकदा एक ग्राहक आला.त्याला एक पुस्तक खरेदी करायचे होते. बेल यांनी दुकानात एक पाटी लावली होती.' एकच किंमत',गिऱ्हाईकाने पुस्तक निवडले आणि किंमत विचारली,बेलने सांगितले.'दोन डॉलर'ऽ. गिऱ्हाईकाने विचारले.काही कमी नाही करणार का? बेलने काही न बोलता पाटीकडे बोट दाखवले! पण तो ग्राहक पुन्हा म्हणाला,अहो,दहा टक्के सूट तर सर्वच दुकानदार देतात.तुम्ही पुस्तक कितीला देणार ते सांगा! बेल म्हणाला, 'आता या पुस्तकाची किंमत आहे दोन डॉलर आणि दहा सेंट.' गिऱ्हाईक आश्चर्याने म्हणाले,'अहो आताच तुम्ही दोन डॉलर म्हणालात,लगेच वाढली कशी? ग्रॅहम बेल म्हणाले,'मित्रा,दोन डॉलर ही या पुस्तकाची किंमत आहे आणि दहा सेंट ही तू माझ्या घेतलेल्या दोन मिनीटांची किंमत आहेर तू अजून उशीर लावशील तर पुस्तकांची किंमत आणखी वाढत जाईल!' त्या ग्राहकाने निमूटपणे वाढलेली किंमत दिली आणि पुस्तक घेऊन बाहेर पडला!

कथा उपदेश: वेळ ही पैशाइतकीच मौल्यावान वस्तू आहे.तिची उधळपट्टी करू नये.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४२ – जनरल माँटेगोमेरीच्या सैन्याने अल एलामीनची दुसरी लढाई जिंकली. उत्तर आफ्रिकेतून जर्मन माघारीची सुरुवात.
- २००३ – इस्तंबूलच्या सिनॅगॉगवर हल्ल्यात २५ ज्यूंची हत्या.

### राष्ट्रीय

- १९१५ – लाहोर कटात भाग घेणाऱ्या विष्णू गणेश पिंगळे यांना फाशी देण्यात आली.
- १९४९ – महात्मा गांधी खून खटल्यातील प्रमुख आरोपी नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना अंबाला तुरुंगात फाशी देण्यात आले.


### जन्म

- १३१६ – जॉन पहिला, फ्रांसचा राजा.
- १३९७ – पोप निकोलस पाचवा.
- १४९८ – एलियोनोर, ऑस्ट्रियाची राणी.
- १७०८ – विल्यम पिट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
- १७३८ – विल्यम फ्रेडरिक हर्शेल, 'युरेनस' या ग्रहाचा सर्वप्रथम वेध घेणारा.
- १७८४ – जेरोम, वेस्टफालियाचा राजा.
- १८५९ – क्रिस्टोफर हॉन्सुंड, नॉर्वेचा पंतप्रधान.
- १८७४ – जॉन हार्टली, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १०२८ – कॉन्स्टन्टाईन आठवा, बायझेन्टाईन सम्राट.
- १६३० – योहान्स केपलर, जर्मन अंतराळतज्ञ व गणितज्ञ.
- १७०६ – त्सांग्यांग ग्यात्सो, सहावे दलाई लामा.
- १८५३ – मारिया दुसरी, पोर्तुगालची राणी.
- १९६९ – इस्कंदर मिर्झा, पाकिस्तानचा पहिला राष्ट्राध्यक्ष.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३७



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत
२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत
४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### शब्दकोडे क्र. ३६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रखवालदार ६.मजल दरमजल १२.सर १३.गरजवंत १४.वरण १५.लालन १७.पात १८.लता २०.शतक २२.जबरदस्त २४.माय २५.आभाळ २७.कटाप २८.बाठ २९.मका ३०.पळस ३१.सरसावणे ३३.उदर ३४.रसद ३६.दलदल ३७.दामोदर ३८.रत ४०.पारवा ४१.फार ४३.भारतीय ४५.डरपोक ४८.हत्ती ४९.आवा ५१.कळकळ ५२.नर ५३.अंकगणित ५५.आळस ५६.उद्धव ५८.मारा ५९.डर ६१.सगा ६२.मदन ६५.समोरासमोर ६८.सागर ७०.तवा ७१.जबाबदारी ७२.कालहरण ७४.अदाकार ७५.ताबडतोब ७६.खेटर ७७.गे ७८.पण

उभे उत्तर : १.रसना २.खर ३.लगत ४.दार ५.रजनी ६.मतलब ७.लव ८.दरखास्त १०.जलाशय ११.ललत १६.नकलाकार १७.पातळसर १९.तारा २१.मकरंद २२.जप २३.दर २४.माठ २५.आपपराभव २६.भाळ २८.बाणेदार २९.मदर ३१.सलवार ३२.रद ३३.उदबत्ती ३५.समय ३६.दरड ३९.तर ४२.सांबार ४४.तीरकमान ४६.पोकळ ४७.कळस ४९.आणि ५०.वातड ५२.नवसागर ५४.गरा ५६.उगा ५७.कमतरता ६०.रसदार ६१.सरकारी ६३.दवा ६४.बोंबाबोंब ६६.मोरी ६७.सरदार ६८.साहस ६९.रणरण ७३.आड ७४.अट

# अवतार मेहेर बाबांची धुनीला 100 वर्षे पूर्ण

## शताब्दी निम्मित विविध कार्यक्रम संपन्न , दर्शनाला गर्दी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



सन १९२५ मध्ये, अरणगाव येथे पावसाळा संपला. दुष्काळापासून वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून १० नोव्हेंबर २०२५ रोजी बाबांनी धुनी पेटवण्याचा आदेश दिला. काही मंडळींनी टेबल-हाऊसच्या उत्तरेकडे एक खड्डा खोदला तर काहींनी लाकूड गोळा केले आणि साहित्य तयार केले. रात्री ११:०० वाजता पेटवण्यात आली. काही भक्तिसंगीतानंतर बाबांनी गावकऱ्यांना लवकर निघून जाण्यास सांगितले, परंतु ते त्यांच्या घरी पोहोचेपर्यंत मुसळधार पावसाने ते भिजले होते. १५ तास मुसळधार पाऊस पडला आणि सर्व विहिरी भरल्या. एका वर्षानंतर आणि पुन्हा दोन वर्षांनी धुनी पेटवली गेली. दोन्ही वेळा पाऊस पडला आणि धुनीच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त अडीच दिवस मुसळधार पूर आला. गावकरी येऊन बाबांसमोर पाऊस थांबवण्याची विनंती करत होते. आता बाबांच्या आज्ञेनुसार दर १२ तारखेला धुनी पेटवली जाते. त्याला १०० वर्षे पूर्ण झाली अशी माहिती मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली. शताब्दी वर्षानिमित्त मेहराबाद येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तर हजारो बाबाप्रेमी यासाठी आले होते धुनी दरवर्षी प्रत्येक महिन्याचा १२ तारखेला सूर्यास्ताच्या वेळी प्रज्वलित करण्यात येते , जसे की प्रत्येक महिन्याला, ही एक अखंड परंपरा आहे जी मेहेर बाबांनी स्वतः सुरू केली. बाबांनी पहिल्यांदा नोव्हेंबर १९२५ मध्ये धुनी प्रज्वलित केली आणि काही वर्षांनंतर त्यांनी दर महिन्याच्या १२ तारखेला ती प्रज्वलित करण्याची सूचना दिली.त्याची शताब्दी पूर्ण झाली. अग्नी बहुतेकदा गुरु आणि संतांशी संबंधित असते, जे त्यांच्या जवळ धुनी जळत ठेवत असत, जी देवाच्या प्रेमाच्या अग्नीचे किंवा त्याच्या मार्गावर चालणाऱ्या साधकाच्या त्यागाचे प्रतीक असते. साई बाबांकडे धुनी होती आणि उपासनी महाराजांकडेही धुनी होती.



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** सकल मातंग समाजाच्या वतीनेसोनई संजय वैरागर मारहाण प्रकरण, खून करण्याची धमकी देणाऱ्याला त्वरित अटक करा आदी विविध मागण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे याना निवेदन देण्यात आले.यावेळी सुनील उमाप,विजुभाऊ पठारे,अजिंक्य भैय्या चांदणे,पप्पू पाटील,रंजीत वैरागर,निलेश सरोदे आदी.

## थोडक्यात बातम्या...



### ओतूरमध्ये बिबट्याची दहशत वाढली!

ओतूर (ता. जुन्नर) (स. गांवकरी) : ओतूर परिसरातील बिबट्याची दहशत पुन्हा एकदा समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी राज लॉन्स येथे संध्याकाळी झालेल्या हल्ल्याच्या त्याच ठिकाणी दिनांक 12 नोव्हेंबर रोजी रात्री 11.10 वाजता बिबट्या वाहनांच्या मागे धावत असल्याचा थरारक CCTV फुटेज उघड झाला आहे. या व्हिडिओमध्ये बिबट्या अगदी कुत्र्यांप्रमाणे मोटरसायकलींच्या मागे धावत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. अचानक आणि वेगाने होणाऱ्या या हालचालीमुळे एखाद्या मोटरसायकल चालकाचा नाहक बळी जाऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. सध्या या भागात चिंता आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी आधी हल्ला झाला होता त्याच ठिकाणी हा नवीन फुटेज मिळाल्याने वनविभागाचीही चिंता वाढली आहे. रात्री अथवा पहाटेच्या वेळेत एकटे प्रवास टाळावा, शक्यतो वाहनाचा वेग नियंत्रित ठेवावा आणि परिसरात हालचाल करताना सावधानता बाळगावी, अशी सूचना नागरिकांना देण्यात आली आहे. ग्रामस्थांनी सुरक्षिततेसाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अनोळखी हालचाली दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### बिबट्याच्या हल्ल्यात बोकड ठार



खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे .वारूळवाडी (ता .जुन्नर ) येथील मीना नदीच्या तीरावर असलेल्या निंबारकरवस्तीवर राहणारे शेळीपालन करणारे तुकाराम निंबारकर यांच्या शेळ्यांच्या कळपावर बुधवार (दि .१२ ) रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास बिबट्याने निंबारकर यांनी बसविलेल्या आर्टीफिशियल इंटेलिजंट (एआय) प्रणालीला भेदून आत प्रवेश करून एका बोकडावर हल्ला केला .त्यात तो बोकड ठार झाला आहे. यावेळी निंबारकर म्हणाले,मागील दीड वर्षात आमच्या गोठ्यावरील शेळ्या ,मेंढ्या ,वासरू अशी १२ पाळीव जनावरे बिबट्याने फस्त केली आहेत .वनविभागाने त्याठिकाणी पिंजरा लावला होता .मात्र ,त्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला नाही .त्यानंतर वनविभागाने एआयवर आधारित स्वयंचलित ,इंटरनेट शिवाय काम करणारी एज -कंप्यूटिंग बिबट्या शोध प्रणाली बसवली .मात्र ,हा बिबट्या तिथे आला त्यावेळेस या एआय प्रणालीच्या सायरनचा आवाज आला नाही .या भागात बिबट्याचा वावर असून आमच्या जीवितास धोका असल्याचे त्यांनी सांगितले. दुसरी घटना म्हणजे विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांच्या बंगल्याच्या बाजूने वीज झटका कुंपण बसवले आहे .तरीही या कुंपणावरून बिबट्याने आत प्रवेश केला असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून आले आहे .दोन्ही ठिकाणी स्वयंचलित यंत्रणा बसूनही बिबटे गोठ्यांच्या घरांच्या आत प्रवेश करत असतील तर यावर वनविभागाने वेगळ्या उपाययोजना केल्या पाहिजेत . अशी विनंती वनविभागाकडे होत आहे.



### जिल्हा नियोजनातून ८ कोटी १३ लाखांचा निधी : डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन व विकास समितीतून ८ कोटी १३ लाख ४४ हजार रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. बिबट्यांच्या वाढत्या हालचालींचा विचार करून पालकमंत्र्यांनी मागील दोन दिवसांपासून जिल्हाधिकारी व वन विभागाशी सतत संपर्क ठेवत परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी चर्चा करून जिल्ह्यास आवश्यक अतिरिक्त यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याबाबत सूचित केले. उपलब्ध निधीतून ३०० पिंजरे, ३०० ट्रॅप कॅमेरे, तसेच जॅकेट, शूज, टॉर्च गन्स आणि संरक्षणात्मक किट यांसारखी रेस्क्यू उपकरणे खरेदी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय २२ रेस्क्यू वाहने तातडीने खरेदी करण्यासही प्रशासनास सांगण्यात आले आहे. जिल्ह्यात ११५० बिबटे असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यास सांगितले असून पकडलेले बिबटे वनतारा येथे स्थलांतरित करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेण्यात आला आहे. या कार्यवाहीची अंमलबजावणी त्वरित करण्याचे निर्देशही देण्यात आले. तालुकानिहाय परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

# इंदुरीकरांनी कॉमेडी शो सुरू करावा : तृप्ती देसाई

**पुणे : (समर्थ गांवकरी)**





प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख उर्फ इंदोरीकर महाराज हे सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहेत. इंदोरीकर महाराज यांच्या मुलीचा शाही थाटात पार पडलेल्या साखरपुड्यानंतर इंदोरीकर महाराज यांच्यावर टीका होत आहे. त्यांच्या मुलीच्या कपड्यावर समाज माध्यमातून प्रचंड टीका करण्यात येत आहे. या सगळ्यातून उद्विग्न होत इंदोरीकर महाराज यांनी थेट आता कीर्तन सोडण्याचाच निर्णय घेतला आहे. मी एक अनौपचारिक व्हिडिओ करून कीर्तन सोडण्याचा निर्णय जाहीर करेल असे इंदोरीकर महाराज म्हणाले आहेत.

आमची पोरं लहान असताना आठ-आठ दिवस माझी त्यांच्याशी भेट होत नसे. मी लोकांसाठी धावत राहिलो. पण आता लोक इतके खाली गेलेत की माझ्या मुलीच्या अंगावरच्या कपड्यांवर कमेंट्स करत आहेत. यापेक्षा वाईट काय असेल? चार दिवसांपासून माझ्या मुलीच्या साखरपुड्याचे कपडे चर्चेत आहेत. पण तिच्या बापाला काहीही विचारत नाहीत. तुमच्याही मुली असतील. तिच्या कपड्यांवर कोणी बोललं तर तुम्हाला काय वाटेल? साखरपुड्यात कपडे मुलीकडून घेतले की नवरदेवाकडून? मग त्यावर माझा काय दोष? एवढी तरी लाज असावी ना. 31 वर्ष मी कीर्तन केलं, लोकांना प्रेरणा दिली, उपदेश केला पण आता मजा उरली नाही, असे इंदोरीकर महाराज म्हणाले.

लोकांच्या शिव्या खात खात आयुष्य गेलं पण आता हे व्यक्तिगत पातळीवर गेलं आहे. मी आजही समर्थ आहे उत्तर द्यायला पण कुटुंबावर बोट गेलं की सहन होत नाही. त्यामुळे मी एक अनौपचारिक व्हिडिओ सादर करून कीर्तन सोडण्याचा निर्णय जाहीर करेल असे देखील इंदोरीकर महाराज म्हणाले आहेत. इंदोरीकर महाराज यांच्या कीर्तन सोडण्याच्या या निर्णयानंतर सामाजिक कार्यकर्त्या आणि भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्ष तृप्ती देसाई यांनी इंदुरकर यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. इंदोरीकर महाराज तुम्हाला कीर्तन सोडायचं की नाही हा सर्वस्वी तुमचा निर्णय आहे पण कीर्तन सोडून तुम्ही कॉमेडी शो सुरू करा, अशी घणाघाती टीका तृप्ती देसाई यांनी इंदोरीकर महाराजांवर केली आहे.

इंदोरीकर जेव्हा तुमच्या कीर्तनामध्ये दुसऱ्यांच्या मुलीची, आई-वडिलांची, घरच्यांशी बदनामी होत होती तेव्हा तुम्हाला काहीच वाटलं नाही. जेव्हा तुम्ही मुलीचा साखरपुडा शाही थाटात साजरा केला आम्हाला त्याबद्दल काहीच अडचण नाही. परंतु, तुम्ही जेव्हा सांगता की साधं लग्न केलं तरी मुलं होतातच किंवा कोणी वरात काढली कोण्या मुलीच्या ड्रेसवर बोलता अनेक बदनामकारक गोष्टी बोलला तेव्हा तुमच्यावर बोललं गेलं आहे, असं देसाई म्हणाल्या आहेत.

दरम्यान, आता तुम्हाला वाटत असेल की हे लोक तुमच्या घरापर्यंत बोलले, पण तुमच्या घरापर्यंत बोलण्याचा संबंध नव्हता. परंतु, तुम्ही दुसऱ्यांच्या घरावरती बोलला तेव्हा तुमच्यापर्यंत हे लोक बोलले आहेत. मग आता तुम्हाला वाटत असेल की फेटा ठेवावा आणि हे बंद करावे तर तो तुमचा निर्णय आहे. कारण तुम्ही जेव्हा दुसऱ्यांना बोलता तेव्हा तुम्हाला मजा वाटते, तुम्ही हसता, तुम्ही टाळ्या वाजवायला लावता आणि तुमच्या घरापर्यंत आलं तर तुम्हाला वाईट वाटतंय. तुम्हाला कीर्तन करायचं नाही करायचं हा तुमचा प्रश्न आहे. शेवटी तुमचं कीर्तन नसतंच ती कॉमेडीच असते त्यामुळे तुम्ही कीर्तन बंद करा आणि कॉमेडी शो सुरु करा, असं म्हणत तृप्ती देसाई यांनी इंदोरीकर यांना थेट आता कॉमेडी शो सुरू करण्याचा सल्ला दिला आहे.

### तृप्ती देसाई यांना फोनवरून धमकी

तृप्ती देसाई यांनी इंदुरीकर महाराजांच्या विधानावर आक्षेप घेतला होता. यानंतर इंदुरीकर महाराजांचे समर्थक अजित दुबे यांनी देसाईंना फोन करून धमकावले. या धमकीनंतरही तृप्ती देसाई यांनी माघार न घेता, "मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे आणि या विषयावर कोणत्याही व्यासपीठावर जाहीर चर्चेला तयार आहे," असे आव्हान दिले आहे. या प्रकरणावरून राजकारण आणि समाजकारणात चांगलीच चर्चा रंगली आहे.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत (रात्री १२ वाजेपर्यंत) शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदर आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, मिरवणुका व प्रेतयात्रांमधील जमावास लागू होणार नाही. तसेच पोलीस अधिकारी, कामावर असलेले शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि सभा किंवा मिरवणूक काढण्यासाठी रीतसर परवानगी घेतलेल्या व्यक्तींनाही हा आदेश लागू होणार नाही.या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद केले आहे.

# ३ फिरत्या दवाखान्यांचे खा. नरेश म्हस्के यांच्या हस्ते लोकार्पण

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



ठाणे महानगरपालिकेचा तीन फिरत्या दवाखान्यांचे शुक्रवारी खासदार नरेश म्हस्के आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. महापालिका मुख्यालयाच्या प्रागंणात झालेल्या या कार्यक्रमास उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे आदी उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य विभाग व पिरामल स्वास्थ तसेच लॅण्डमार्क केअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांसाठी हे फिरते दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. महापालिकेच्या क्षेत्रात नागरिकांच्या सोयीसाठी, विशेषत: झोपडपट्टी भागात दर्जेदार विनामूल्य आरोग्य सेवा देण्यासाठी ही तीन मोबाईल युनिट्स म्हणजेच फिरते दवाखाने सुरू करण्यात येत आहेत. या प्रत्येक युनीटमध्ये एक डॉक्टर, एक नर्स, एक औषधनिर्माण अधिकारी, आरोग्य शिक्षक आणि वाहन चालक असे पथक समाविष्ट आहे. हे फिरते दवाखाने स. ९.३० ते दु. ४.३० या वेळेत महापालिका क्षेत्रातील वेगवेगळ्या विभागात कार्यरत असतील. या दवाखान्यात, जवळची दृष्टी सुधारण्यासाठी वाचन चष्मा पुरवण्यात येईल. तसेच, डॉक्टरांमार्फत रुग्णांची आवश्यकतेनुसार हिमोग्लोबीन चाचणी, रक्त शर्करा चाचणी करण्यात येईल. उच्च रक्तदाब, मधुमेह, सर्दी, खोकला, ताप, डायरिया आदी आजारांचे जलद निदान करून औषधोपचार विनामूल्य करण्यात येईल. असंसर्गजन्य रोगांचे प्रतिबंध, व्यवस्थापन आणि निरोगी जीवन शैली बद्दल सामुदायिक जागृती या फिरत्या दवाखान्यांमार्फत केली जाणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दिली.

# जिल्हा परिषद शाळा आंबोली वॉटर फिल्टरचे उद्घाटन

**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**



आदिवासी दुर्गम भागातील आंबोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर माजी विद्यार्थी यांच्या हस्ते बसविण्यात आला. "स्वच्छ पाणी निरोगी जीवन" या उद्देशाने प्लॅनेट वॉटर फाउंडेशनच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी उपलब्ध होणार असून आरोग्य विषयक जाणीव वाढविण्यास मदत होईल असे सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर यांनी सांगितले .

यावेळी वॉटर प्लॅनेट फाउंडेशनचे चैतन्य कुसुरकर ,रामदास जाधव ,संतोष लंगाळे ,सागर गोडगे यांच्या वतीने गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे व मुख्याध्यापिका पूनम तांबे यांच्याकडे या प्रकल्पाचे हस्तांतर प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे व माजी विद्यार्थी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला .या मेळाव्यास देवराम भालचिम, शांताराम भालचिम, हेमलता भालचिम, संतोष दाते ,युवराज मोहरे ,सुरेश भालचिम,मनिषा दाते ,ममता भालचिम,गंगा सांगडे ,विष्णू भालचिम,अनिल कोथेरे, नितीन कसाळे, सुभाष मोहरे , मुख्याध्यापक संजय वाघ उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अंकुश कोकणे सर यांच्या प्रयत्नातून वॉटर प्लॅनेट प्रोजेक्ट आंबोली शाळेला प्राप्त झाला . प्रास्ताविक मुख्याध्यापिका पूनम तांबे सूत्रसंचालन बाळू दिघे आभार छाया अरगडे यांनी मानले .कार्यक्रमाचे नियोजन निशा साबळे व मिनल गौरखेडे यांनी केले.

# माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांचा सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- डॉ. सर्जेराव निमसे यांचे शैक्षणिक कार्यात मोठे योगदान : वसंत लोढा

लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी शैक्षणिक कार्यात मोठे योगदान दिले आहे. श्री निमसे यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडली आहे. डॉ.निमसे यांनी लखनऊ विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाची उभारणी करून छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारला आहे.ही महाराष्ट्रासाठी मोठ्या अभिमानाची बाब आहे. असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांच्या ७५ व्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने त्यांच्या सत्कार करण्यात आला.

# अहिल्यानगर शहरात बालदिन उत्साहात साजरा; अत्याचार मुक्त अभियानाचे प्रारंभ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



स्नेहालय संचलित उडान प्रकल्प, मराठी पत्रकार परिषद, जिल्हा परिषद जिल्हा महिला व बालविकास कार्यालय व जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंती निमित्त लालटाकी येथील त्यांच्या पुतळ्यास्थळी लहान मुलांसह बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बाल अत्याचार मुक्त अभियानाचे प्रारंभ करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा महिला बालविकास अधिकारी संजय कदम, पोलीस उपाधीक्षक दिलीप टीपरसे, भरोसा सेलच्या पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, प्रभारी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड, नागोरी मुस्लिम मिसगर जमात स्टचे अध्यक्ष रेहान काझी, उडान प्रकल्पाच्या मानद सचिव ॲड. बागेश्री जरंडीकर, स्नेहालयाचे संचालक हनीफ शेख, चाईल्ड लाईनचे महेश सूर्यवंशी, डॉ. अंशु मुळे, मुन्नवर हुसेन, वाजिद खान, तन्वीर खान आदींसह बालभवन प्रकल्प व अहमदनगर उर्दू स्कूल व एम्स इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. परिसरात तिरंगे ध्वज, रांगोळी व फुग्यांची सजावट करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी भारत माता की जय...., देश की ताकत हम सब बच्चे..., जोडो जोडो भारत जोडो... च्या घोषणा देत पाहुण्यांच्या हस्ते आकाशात फुगे व पांढरे कबुतरे सोडण्यात आली. तर जिल्हा बाल अत्याचार मुक्त करण्यासाठी योगदान देण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

प्रास्ताविकात हनीफ शेख म्हणाले की, बालकांवरील अन्याय, अत्याचार रोखण्यासाठी व बालकांच्या हक्कांची जपणूक करण्याचे कार्य उडान प्रकल्प करीत आहे. जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे बाल अत्याचार मुक्त होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहे. यासाठी प्रशासनाचे व संवेदनशील अधिकाऱ्यांचे विशेष योगदान मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, बालपण हे जीवनातील सोनेरी क्षण असतात. जीवनात मागे पाहताना बालपण आठवते. मात्र सध्या बालपणातच विवाह होत असल्याने त्याचे गंभीर परिणामांना सामोरे जावे लागत आहे. बालविवाह मुक्त जिल्हा होण्यासाठी १३२७ गावांच्या ग्रामसभेत या विषयावर जागृती करण्यात आली. तसेच बाल अत्याचार मुक्त जिल्हा होण्यासाठी प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहणार आहे. बालकांवरती होणारे अत्याचार रोखण्यासाठी मुलांसह पालकांमध्ये जागृती आवश्यक आहे. मुलांना स्वसंरक्षणाचे धडे दिल्यास ते आपले संरक्षण अधिक चांगल्या पध्दतीने करु शकणार असल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे यांनी विश्वास संपादन केलेले जवळचे व्यक्तीनी बालकांवर अत्याचार केल्याचे अनेक घटनांमधून समोर आले आहे. यासाठी मुलांना चांगला व वाईट स्पर्श याची माहिती देणे आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

# आर्य गुरुकुल शाळेत बालदीनी फ्रूट्स डे उत्साहात साजरा




**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

बालदिनाचे औचित्य साधत आर्य गुरुकुल स्कूलमध्ये फ्रूट्स डे चे आयोजन उत्साहात करण्यात आले. प्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची ताजी फळे आपल्या खाऊच्या डब्ब्यात आणून रंगतदार पद्धतीने हा दिवस साजरा केला. सर्व पालकांनी आपल्या मुलांसाठी वेळात वेळ काढून वेगवेगळ्या फ्रूट्स चे कटाऊट बनवून मुलांना दिले. कार्यक्रमाची सुरुवात बालदिनाच्या महत्त्वावरील थोडक्यात माहिती देऊन करण्यात आली. त्यानंतर शिक्षकांनी फळांचे प्रकार, त्यांचे पोषणमूल्य, तसेच रोजच्या आहारात फळांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मुलांना आकर्षक पद्धतीने फळांची ओळख, फळांचे रंग, स्वाद व आरोग्यदायी फायदे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. लहानग्यांनी आनंदात फळांपासून विविध क्रिएटिव्ह आकृती तयार केल्या. शाळेतील वातावरणात बालकांच्या हसण्याने आणि उत्साहाने आनंदी वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना मिसळून तयार केलेला फळसलाड दिला गेला. फ्रूट्स डे च्या निमित्ताने मुलांमध्ये संतुलित आहाराचे महत्त्व, स्वच्छता, आणि नैसर्गिक अन्नाची ओढ वाढवण्याचा संदेश दिला गेला. प्रसंगी शाळेचे सर्वेसर्वा ॲड. तुषार म्हात्रे उपस्थित होते. त्यांनी मुलांचे तसेच विशेष करून पालकांचे कौतुक केले. मुख्याध्यापिका प्रियंका ठीकेकर यांनी उपक्रम यशस्वी केल्याबद्दल शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये आरोग्यदायी सवयी आणि शिकण्याची आवड निर्माण होते.



अहिल्यानगर : अहिल्यानगर - मनमाड मार्गावरील सावळीविहिर ते विळद घाट या दरम्यानच्या सुमारे ७५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व दुरुस्तीचे काम १२ सप्टेंबर २०२५ पासून सुरू आहे. या काळात वाहतुकीची कोंडी होऊ नये आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११५ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून १२ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर २०२५ या कालावधीत या मार्गावरील अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश जारी केले आहेत.

## थोडक्यात बातम्या...




### देश, समाजसेवेसाठी जात, प्रांत, भाषेच्या पलिकडे जायला हवे : सुनील देवधर

पुणे (स. गांवकरी) : "पश्चिम बंगालसारख्या दुसऱ्या राज्यातून येऊन अमितकुमार बॅनर्जी यांनी संपर्क संस्थेच्या माध्यमातून बालग्रामसारखा उपक्रम राबविला. महाराष्ट्रात वंचित घटकांसाठी, अनाथ मुलांसाठी संस्थेच्या माध्यमातून इतके मोठे काम उभे केले, ही खऱ्या अर्थाने आनंदाची गोष्ट आहे. देश, समाजसेवेसाठी जाती-धर्म, प्रांत, भाषा यापलीकडे जाऊन कार्य करायला हवे," असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे माजी सचिव आणि माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांनी केले. अमितकुमार बॅनर्जी यांच्या जीवन आणि कार्यावर आधारीत 'संघर्षगाथा माझ्या आयुष्याची' या आत्मकथनपर पुस्तकाच्या प्रकाशनाप्रसंगी देवधर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, माजी शिक्षणाधिकारी व साहित्यिक डॉ. अनिल गुंजाळ, साहित्यिक प्रसाद मिरासदार, अमितकुमार बॅनर्जी, रत्ना बॅनर्जी, उत्कर्ष प्रकाशनाचे सु. वा. जोशी, सुधीर राशिनकर, अण्णा कातळे आदी उपस्थित होते. सुनील देवधर म्हणाले, "संपर्क संस्थेच्या बालग्राम या उपक्रमाचे संस्थापक अमितकुमार बॅनर्जी हे महाराष्ट्राचा अभिमान आहेत. बॅनर्जी यांच्या रुपाने महाराष्ट्रातील असंख्य अनाथ मुलांना ममता मिळाली आहे. निराधार मुलांसाठी ते देवापेक्षा कमी नाहीत. प्रत्येक व्यक्तीला समाजाकडून खूप गोष्टी आयुष्यभर मिळत असतात, सेवाभावातून आपण प्रत्येकाने त्याची परतफेड करायला हवी. मात्र जे लोक समाजासाठी काही करत नाहीत, ते कृतघ्न असतात. तसेच आपण करत असलेले सेवाकार्य हे निरपेक्ष, पवित्र असायला हवे, त्यामध्ये भ्रष्टाचार नको आणि त्याचा व्यवसाय होणार नाही, याचीही काळजी घ्यायला हवी."



### 'व्हॉइस ऑफ स्पेशली एबल्ड पीपल'तर्फे ७५ दृष्टिहीनांना एआय स्मार्ट ग्लास भेट

पुणे (स. गांवकरी) : जागतिक स्तरावर दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत, संयुक्त राष्ट्रसंघाची सदस्य असलेल्या 'व्हॉइस ऑफ स्पेशली एबल्ड पीपल' या संस्थेतर्फे पुण्यातील वानवडी येथील दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्थेतील ७५ दृष्टिहीन व्यक्तींना एआय स्मार्ट ग्लास भेट देण्यात आले. उच्च दर्जाच्या या अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने दृष्टिहीन विद्यार्थी आता अधिक सुलभ आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतील. दिव्यांगांच्या जीवनात तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांचे जीवन अधिक सुलभ, स्वतंत्र आणि सशक्त बनवण्याचे कार्य 'व्हॉइस ऑफ स्पेशली एबल्ड पीपल' ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक प्रणव देसाई यांनी अमेरिकेतून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थितांना संबोधित केले. भारताचे पहिले पॅरा ऑलिंपिक सुवर्णपदक विजेते मुरलीकांत पेटकर यांनी ऑनलाईन उपस्थित राहून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. लंडनहून खास या कार्यक्रमासाठी आलेल्या देणगीदार अरुणिमा यांनी समाधान व्यक्त केले. जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हीरेमठ, संस्थेचे सल्लागार डॉ. उत्तम ओझा, दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. मुरलीधर कचरे, अधिवक्ता गिरीश शेवते, मुख्याध्यापिका शिवानी सुतार, आरती टेकवडे आदी मान्यवर उपस्थित होते. तांत्रिक सहाय्यक मोहम्मद फैज आणि ध्रुव चावला यांनी दृष्टिहीनांना स्मार्ट ग्लास वापरण्याचे प्रशिक्षण दिले.

### बेल्हे ग्रामपंचायत नूतन इमारतीसह विविध कामांचा शुभारंभ

आळेफाटा (स. गांवकरी) : बेल्हे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल चार कोटी तीस लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आज ग्रामपंचायतीतर्फे मोठ्या उत्साहात पार पडले. या निधीतून नवीन ग्रामपंचायत इमारत उभारणीसाठी तीन कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी ८० लाख नागरी सुविधा निधीतून, ६० लाख वित्त आयोग निधीतून, तर उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीकडून उभारली जाणार आहे. गावाच्या सौंदर्यवर्धनासाठी जिल्हा परिषद निधीतून वीस लाख रुपये खर्चून आकर्षक बगीचा तयार करण्यात येणार आहे. तसेच स्मशानभूमी बांधकामासाठी वीस लाख, आणि बसस्थानक परिसरातील स्वच्छतागृह व स्नानगृहासाठी वीस लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या विकासकामांच्या भूमिपूजनावेळी सरपंच मनीषा जानकु डावखर, उपसरपंच राजेंद्र पिंगट, ग्रामविकास अधिकारी किशोर रायसिंग वाकडे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते.गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने ही कामे महत्त्वाचे पाऊल असल्याचे सरपंच मनीषा डावखर यांनी सांगितले.

# "स्मार्ट सुनबाई" २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रावर करणार राज्य!"




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नाविन्यपूर्ण संकल्पना आणि उत्सुकतेने सजलेला एक धमाल मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित हास्य, थरार आणि गूढतेने भरलेला एक नवाकोरा सिनेमा "स्मार्ट सुनबाई" २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या नुकताच रिलीझ झालेल्या ट्रेलर ने प्रेक्षकांच्या मनात औत्सुक्याची ठिणगी पेटवली आहे. एक स्पष्ट होतं की या कथेत काहीतरी विलक्षण आणि गूढ दडलेले आहे ज्यामुळे चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. सिनेमात असलेल्या गाव-शहराची भन्नाट जुगलबंदी, खुमासदार विनोद आणि एका गूढ रहस्याचा ताण यांचा सुंदर मिलाफ यामुळे प्रेक्षकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण झाला आहे. "ही स्मार्ट सुनबाई नक्की कोण? आणि तिच्या आयुष्यात असं काय घडणार आहे?" संतोष जुवेकर, रोहन पाटील, भाऊ कदम, किशोरी शहाणे, सायली देवधर, मोहन जोशी, दीपक शिर्के, प्राजक्ता हनमघर, प्राजक्ता गायकवाड, उषा नाईक, अंशुमन विचारे, स्नेहल शिदम, विनम्र बाबल, भक्ती चव्हाण, दीप्ती सोनवणे, अनुष्का बेनके, पूजा राजपूत, सुचिका जोशी, विद्या मेहेत्रे, मोनिका बंगाळ, आर्या सकुंडे, वैशाली चौधरी, सपना पवार, कांचन चौधरी हे लोकप्रिय कलाकार या सिनेमात झळकणार असून, त्यांची केमिस्ट्रीच या चित्रपटाची खरी जमेची बाजू ठरणार आहे. चित्रपटाची कथा आणि लेखन योगेश शिरसाट यांनी केले असून, विजय नारायण गवंडे,साई - पियुष यांनी या सिनेमाला बहारदार संगीताची साथ दिली आहे. गीतकार वैभव देशमुख, अदिती द्रविड असून अजय गोगावले, वैशाली माढे, आनंदी जोशी, सावनी रवींद्र, उर्मिला धनगर यांचे सुरेल स्वर या सिनेमाला लाभले आहेत. प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची लाट निर्माण करणारा हा नवीन सिनेमा लवकरच मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित चित्रपट "स्मार्ट सुनबाई" २१ नोव्हेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.

## बिबट्याचा धुमाकूळ; शेतकऱ्यांच्या पाच शेळ्या फस्त

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील कुशिरे खुर्द येथे शेतकरी संतोष चिंतामण उंडे यांच्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला करून तब्बल पाच शेळ्या ठार केल्या.या घटनेमुळे उंडे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण कुटुंब भीतीच्या सावटाखाली आहे.माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी शुक्रवार दि. १४ रोजी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. दरम्यान, कुशिरे परिसरातील इतर शेतकऱ्यांच्या शेळ्यांवरही यापूर्वी बिबट्याने हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत.त्यामुळे या भागात बिबट्याची दहशत प्रचंड वाढली असून शेतकरी अत्यंत चिंताग्रस्त



आहेत.आदिवासी बांधवांनी तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करून नागरिकांच्या सुरक्षिततेची उपाययोजना करावी, अशी मागणी केली आहे.तसेच उंडे यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई तातडीने देण्याची मागणीही करण्यात आली.

## शिरूर–ढवळगाव शटल बस सेवा पुर्ववत सुरू करा - अमोल बोरगे

■ आमदार विक्रमदादा पाचपुते यांनीही घेतली दखल

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

शिरूर – ते श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव ही शटल बस सेवा पूर्वीप्रमाणे तातडीने सुरू करावी तसेच दिवसातून किमान तीन फेऱ्या नियमितपणे चालू ठेवाव्यात, अशा प्रमुख मागण्या माजी ग्रामपंचायत सदस्य अमोल बोरगे यांनी शिरूर आगार प्रमुखांकडे लेखी निवेदनाद्वारे मांडल्या आहेत. विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात येण्या-जाण्याची मोठी गैरसोय होत असल्याने ही



सेवा तातडीने पुन्हा सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावेळी अमोल बोरगे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते विशाल बनकर, युवा नेते दत्ताशेठ शिंदे, तसेच विद्यार्थी उपस्थित होते. शटल बस बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना जादा भाडे देऊन खाजगी वाहनांचा वापर करावा लागत असल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.दरम्यान, या संपूर्ण प्रश्नाची गंभीर दखल घेत श्रीगोंदा तालुक्याचे आमदार माननीय विक्रमदादा बबनराव पाचपुते यांनी शिरूर आगारप्रमुखांशी दूरध्वनीवर चर्चा केली. शटल बस सेवा तातडीने सुरू करण्याबाबत त्यांनी आगारप्रमुखांना स्पष्ट सूचना दिली. आगारप्रमुखांनी आमदार पाचपुते यांच्या सूचनेची दखल घेत आळंदी यात्रेनंतर शिरूर–ढवळगाव शटल बस सेवा पुन्हा सुरू करण्यात येईल, असे ठोस आश्वासन दिले आहे.

## नेक्सस वेस्टएंड मॉल आणि द पॅव्हिलियन मॉलमध्ये ब्यूटी फेस्टिव्हलचे आयोजन




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

लग्नसोहळे, पार्टी आणि गिफ्टिंगचा सीझनच्या मुहूर्तावर 'नेक्सस वेस्टएंड मॉल' आणि 'द पॅव्हिलियन मॉल, पुणे' यांनी नुकत्याच बहुप्रतीक्षित ब्यूटी फेस्टिव्हलच्या तिसऱ्या पर्वाची 'द ग्लॉस बॉक्स'ची घोषणा केली. येत्या १४ नोव्हेंबरपासून सुरू होणारा हा उत्सव सौंदर्य, ग्रूमिंग आणि वेलनेस क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँड्सना एका छताखाली आणणार आहे. त्यामुळे पुणेकरांना ग्लॅमर, स्टाइल आणि सेल्फ-केअरचा आनंद घेता येणार आहे. या माध्यमातून खरेदीदारांना लग्न आणि सुट्ट्यांच्या हंगामासाठी मेकअप, स्किनकेअर, हेअरकेअरपासून सुगंधांपर्यंतच्या सर्व नव्या ट्रेंड्सची आणि अत्यावश्यक प्रॉडक्ट्सची ओळख होण्यास मदत होणार आहे. या फेस्टिव्हलमध्ये 'लाइव्ह डेमो','ब्यूटी एक्स्पर्ट्स'च्या टिप्स आणि इंटरॲक्टिव्ह मेकओव्हर झोन्सचा समावेश असणार असून, याद्वारे आगामी सण आणि समारंभांसाठी सर्वोत्तम दिसण्यास मदत होणार आहे. 'नेक्सस वेस्टएंड मॉल' मध्ये शुक्रवार, १४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी नायका आर्टिस्ट' कडून ग्लॉस बॉक्स मेकओव्हर सेशन तसेच फुर्ताडो स्कूल ऑफ म्युझिकच्या विद्यार्थ्यांचा आणि मेंटर्सचा लाइव्ह म्युझिकल परफॉर्मन्सचे आयोजन करण्यात येणार आहे. शनिवार, १५ नोव्हेंबर सकाळी १०:३०पासून बालदिन विशेष कार्यक्रम. यामध्ये एलईडी गेम झोनमध्ये (फक्त आमंत्रित मुले आणि पालकांसाठी) फ्री गेमिंग सेशन, कुटुंबांसाठी विविध खेळ, सर्जनशीलता उपक्रम असणार आहेत.

## एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी पंचसूत्री : परिवहन मंत्री

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक 'पंचसूत्री आराखडा' तयार केला आहे. आगार पातळीपासून प्रादेशिक कार्यालयापर्यंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी अधिक स्पष्ट करत, सुधारणा, 'वेग' आणि 'नियमितता' या आधारे एसटी महामंडळाला पुढे नेण्याचा निर्धार केल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. मुंबई येथे एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर यांच्यासह सर्व खाते प्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रक उपस्थित होते. एसटी स्वतःला 'चल संस्था' म्हणून परिभाषित करते.

### 'चितळे रोडवरील नेहरू मार्केट संकुल प्रकरण'

# बैठक फिस्कटली : वरच्या मजल्यावर गाळे देण्याचा आयुक्तांच्या भूमिकेला विरोध

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

तब्बल १३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नेहरू मार्केट संकुलाच्या उभारणीच्या वादाला पुन्हा तोंड फुटले आहे. महापालिकेच्या प्रस्तावित संकुलात मूळ गाळेधारक व ओटेवाल्यांना जागा देण्याबाबत गुरुवारी महापालिकेत (दि.१३ नोव्हेंबर) झालेली बैठक निष्फळ ठरली. आयुक्तांनी "वरच्या मजल्यावर गाळे देऊ" अशी भूमिका घेतल्याने गाळेधारक संतप्त झाले आणि अखेर ही बैठक फिस्कटली. नेहरू मार्केट गाळेधारक युनियन व सर्व गाळेधारकांची आयुक्तांसोबत बैठक पार पडली. गाळेधारकांनी




"आम्हाला खालच्या मजल्यावरच गाळे हवेत" असा आग्रह धरला. परंतु आयुक्तांनी "संकुलात वरच्या मजल्यावर गाळे देण्यात येतील" असे स्पष्ट केले. यावरून युनियनचे पदाधिकारी आणि आयुक्तांमध्ये तीव्र वाद झाला. अखेरीस सर्व गाळेधारकांनी एकमुखाने बैठक बहिष्कृत करत बाहेर पडले.

या बैठकीला नेहरू मार्केट गाळेधारक युनियनचे अध्यक्ष व माजी नगरसेवक संजय झिंजे, अजय झिंजे, शुभम झिंजे, निलेश रोकडे, ऋषी तरोटे, पिंटू कोंडके, नितीन ताठे, संजय मिसाळ, बालाजी गौरी, धनंजय देशमुख, वसंतलाल गुगळे, संपतलाल गुगळे, पांडुरंग खेतमाळस, किसन केळकर, बाबासाहेब चौधरी, प्रदीप इटकर आदी गाळेधारक उपस्थित होते.

चितळे रोडवरील नेहरू मार्केटचा विकास विषय २०१२ पासून प्रलंबित आहे. भाजी मार्केटसह व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन आता प्रत्यक्ष काम सुरू करण्याची तयारी सुरू आहे. मात्र, १३ वर्षांपूर्वी बाजार जमीनदोस्त करताना तत्कालीन आयुक्तांनी "मूळ ओटेवाल्यांना व गाळेधारकांना वर्षभरात जागा देऊ" असे आश्वासन दिले होते. यासंदर्भात महापालिकेने उच्च न्यायालयात लेखी हमीही दिली होती.

आता संकुल उभे राहत असताना ७२ ओटेधारक, १२ गाळेधारक आणि ३ कराराने दिलेल्या मोकळ्या जागांचे भाडेकरू या सर्वांना जागा देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. संकुलातील गाळ्यांचे वाटप वरच्या मजल्यावर करण्याच्या आयुक्तांच्या निर्णयाला गाळेधारकांनी जोरदार विरोध दर्शविला. संजय झिंजे म्हणाले की, रस्त्यावर भाजी खरेदी करणारा ग्राहक दुसऱ्या मजल्यावर जाणार नाही. सर्व गोरगरीब गाळेधारक असून, त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही.

आयुक्त राजकीय दबावाखाली काम करत असून, स्वतःचे निर्णय घेऊ शकत नाही. आयुक्तांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही. त्यांनी दिलेले आश्वासन पाळले नाही, तर आम्हाला पुन्हा न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# शेतकऱ्यांचे अनुदान तात्काळ खात्यावर जमा करा



**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

अतिवृष्टी झाल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांचे अनुदान लवकरात लवकर शेतकयांच्या खात्यात जमा करा अन्यथा तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे यांनी प्रशासनाला दिला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (शरदश्चंद्र पवार गट) वतीने तहसीलदार यांना दुष्काळी अनुदान तात्काळ मिळावे यासाठी निवेदन देण्यात आले त्या निवेदनात म्हणटले आहे की, दि. २८ व २९ आक्टोंबर रोजी महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली यामध्ये वैजापुर तालुक्यातील शेतकर्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून नेला. दुभती जनावरे पाण्याच्या पुरात वाहुन गेली.

मका, कापुस सोयाबीन यांचे मोठे नुकसान झाले. सरकारने तत्परता दाखवत त्यांना तात्काळ मदत करण्याची घोषणाही केली.

त्यानंतर पंचनाम्यांची प्रक्रिया सुरु केली परंतु ई-केवायसी नसेल तर अनुदान जमा होण्यास अडचणी निर्माण झाल्या. शासनाने जाहीर केलेले अनुदान अत्यल्प होते.

शेतकऱ्यांचे नुकसान पाहता मिळणारे अनुदान पुरेशे नव्हते. त्यानही ई-केवायसी नसल्यामुळे शेतक-यांना सेतु केंद्रावर चकरा माराव्या लागत आहेत हि सर्व परास्थिती बघता शासनाने ई-केवायसी करण्यासाठीची आवश्यक बेवसाईट तात्काळ सुरू करावी आणि शेतक-यांच्या खात्यात पुरेसे अनुदान जमा कराने अन्यथा तहसील कार्यालयासमोर २० नोव्हेंबर पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही यावेळी तालुकाध्यक्ष प्रकाश बापु ठुबे यांनी दिला.

असून या निवेदनावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे पाटील, शहराध्यक्ष जुबेर भाई चाऊस, जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया सावंत पाटील, कॉंग्रेसचे नेते दिगंबर वाकचौरे , नारायण पवार माजी उपसरपंच , काकासाहेब मोगल, दादासाहेब डुकरे आदिंच्या सह्या आहेत.a



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :-** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची व नगर तालुका अध्यक्षपदी शरद पवार यांची निवड झाल्याबद्दल नगर तालुक्याच्या वतीने सत्कार करताना प्रकाश पोटे, रामेश्वर निमसे ,केशव बेरड, पापामिया पटेल ,सागर निंबाळकर ,शरद बडे ,चंदूकाका पवार आदी.

## थोडक्यात बातम्या...



### भोकरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी विपुल जाधव यांची बिनविरोध निवड

■ विरोधी गटाचा दे धक्का - समर्थकांचा जल्लोष, गावाच्या विकासासाठी तत्पर राहण्याचा उपसरपंचांचा निर्धार

**पडघा (स. गांवकरी) :** भिवंडी तालुक्यातील भोकरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाच्या निवडणुकीत विरोधी गटाने सत्ताधाऱ्यांना धक्का देत बिनविरोध विजय मिळवला आहे. या निवडणुकीत विपुल लक्ष्मण जाधव यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यासी अधिकारी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी प्रल्हाद वानखेडे यांनी निवडणुकीचे कामकाज पार पाडले. या प्रक्रियेत सर्व विद्यमान सदस्यांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे, सत्ताधारी गटाविरोधात रोहीदास गोरले, माजी सरपंच महादेव गोरले, माजी उपसरपंच उमेश कथोरे, पंडीत माळी, मिथुन जाधव, महेश चव्हाण आणि विश्वास भोईर यांच्या गटातील उमेदवाराची बिनविरोध निवड झाल्याने विरोधी गटाचा विजय झाला आहे. निवड जाहीर होताच समर्थकांनी मोठ्या संख्येने जल्लोष व्यक्त केला. फटाक्यांची आतषबाजी करून व मिठाई वाटप करत त्यांनी आनंद व्यक्त केला. नवनिर्वाचित उपसरपंच विपुल जाधव यांनी आपल्या निवडीनंतर गावकऱ्यांचे आभार मानत, "गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर राहील," अशी भावना व्यक्त केली.

### पतीने केली पत्नीची निर्घृण हत्या : पोलीसांनी पतीला ठोकल्या बेड्या

**भिवंडी (स. गांवकरी) :** भिवंडी तालुक्यातील बापंगाव येथे चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची धार धार शस्त्राने गळा चिरून निर्घृण हत्या केल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे. अनिता बेरडीया (47) असे हत्या झालेल्या पत्नीचे नाव असुन ती मुलासोबत पतीला सोडुन आर्या रेसीडेन्सी मल्हार नगर बापंगाव येथे विभक्त राहत होती तर पती मोहन बेरडीया(48) भिवंडी तालुक्यातील देवरुंग येथे मोठ्या मुलांसोबत राहत होता पती मोहन बेरडीया हा अनिता हीच्या चारित्र्यावरून नेहमी संशय घेऊन मारहाण करीत होता. तसेच चारित्र्याच्या संशयावरून त्या दोघांच्यात नेहमी खटके उडत होते 10 नोव्हेंबर रोजी अनिता बेरडीया हीचा विवस्त्र अवस्थेतील मृतदेह तीच्या मुलानां व पोलीसांना बापंगाव येथील राहत्या घरी आढळून आला होता. त्यामुळे अनिता हीचा मुलगा हितेश मोहन बेरडीया याच्या तक्रारी वरुन पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता कुठलाही पुरावा नसताना पडघा पोलीसांनी आपले स्त्रोत वापरून पती मोहन बेरडीया याला ताब्यात घेऊन पोलीस खाक्या दाखवुन चौकशी केली असता त्याने पत्नी अनिता हीची हत्या केल्याची कबुली दिली. पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून पती मोहन बेरडीया याला अटक केली आहे. सदर घटनेचा अधिक तपास पडघा पोलीस करीत आहेत.









### ओबीसी उमेदवारात मोठी चूरस?

**नविन नांदेड (स. गांवकरी) :** प्रभाग क्र २० मधून भाजपाचे ओबीसी पुरुष उमेदवार श्रीनिवास जाधव , वैजनाथ देशमुख, संतोष वर्मा , विनोद कांचनगीरे का अन्य कोण ? नविन नांदेड दक्षिण मतदार संघातील सिडको हाडको प्रभाग क्र २० मध्ये एक जागा पुर्वी प्रमाणेच ओबीसी पुरुषा साठी तर एक जागा ओबीसी महिले साठी आरक्षित असून या प्रभागा मध्ये पुर्वी कॉग्रेस चे नगरसेवक असलेले श्रीनिवास जाधव ओबीसी पुरुष तर ओबीसी महिले मधून मंगला देशमुख हे चालू सदस्य असून हे यापूर्वी कॉग्रेस चे नगरसेवक होते तर आता हे सर्वजन सध्या माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेत्तुत्वात एकाच पक्षात असल्यामुळे निवडणुकी च्या वेळी पक्षाला मोठी डोके दुखी ठरणार आहे कारण या दोन जागेसाठी कोण असणार उमेदवार भाजपा पक्ष कोणचा विचार करणार कोण असणार उमेदवार व भाजपा पक्ष नेत्तृत्व कुणाला देणार उमेदवारी देऊन इतर इच्छुकांना करणार थंड का हे कुणी करणार बंड हेच पहावा येत्या निवडणुकीत पाहावा लागणार आहे.

# बिहार विजयावर वैभव पिचड यांची कठोर प्रतिक्रिया

■ "फेक नॅरेटिव्हला जनता थारा देत नाही"



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

बिहार विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि मित्र पक्षांच्या महायुतीला मिळालेल्या ऐतिहासिक विजयाने देशातील जनता विरोधकांच्या फेक नॅरेटिव्हला थारा देत नसल्याचे पुन्हा सिद्ध झाले असल्याची प्रतिक्रिया अकोले विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, आदिवासी विकास महामंडळाचे संचालक व अमृतसागर दूध संघाचे अध्यक्ष वैभवराव पिचड यांनी व्यक्त केली.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सिताराम भांगरे, अकोले नगरपंचायत नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपाध्यक्ष शरद नवले, मंडलाध्यक्ष राहुल देशमुख, शंभुराज नेहे, नगरसेवक विशाल चौधरी, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इंजि. सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, नगरसेवक विजय पवार, बाबुराव पवार, पंडित नेहे, ज्येष्ठ शेतकरी खंडू वाकचौरे, बबलू वाकचौरे, वैभव वाकचौरे, मेजर नामदेव लोखंडे, विजय वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा व सर्व मित्र पक्षाच्या नेत्यांचे अभिनंदन करताना वैभवराव पिचड म्हणाले,

"बिहारच्या जनतेने खोट्या प्रचाराला बळी न पडता विकास प्रक्रियेला साथ दिली. कॉंग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांनी प्रचारात अतिशय खालच्या स्तरावर जाऊन केलेली वक्तव्ये, विशेषतः पंतप्रधानांच्या मातोश्रींविषयीची भाषा, अत्यंत दुर्दैवी होती."

ते पुढे म्हणाले, "निवडणुकीपूर्वी व्होट चोरीच्या नावाखाली दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला, संविधानिक संस्थांवरही आरोप करण्यात आले. आपल्या राज्यातील काही जाणते राजेसुद्धा या नॅरेटिव्हमध्ये सहभागी झाले. मात्र बिहारची जनता कुठेही बळी पडली नाही." बिहारमध्ये कॉंग्रेस पक्षाची झालेली वाताहात पाहता राहुल गांधींनी परदेशात जाऊन देशाच्या लोकशाहीवर टीका करण्याऐवजी स्वतःच्या पक्षाच्या अस्तित्वासाठी काम करावे, अशी टीका देखील यावेळी वैभवराव पिचड यांनी केली.

# डॉक्टरांचा सन्मान व महापुरुषांच्या प्रतिमांची भेट देऊन आरोग्य सेवेचा गौरव

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक बांधिलकीची ओळख जपणारी प्रेरणा अपंग सेवा संस्था, श्रीगोंदा ही केवळ अपंगांच्या सेवेसाठीच नव्हे, तर समाजातील विविध घटकांमध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठीही नेहमीच पुढाकार घेते. या सामाजिक संवेदनशीलतेचे आणखी एक उदाहरण नुकतेच पाहायला मिळाले, जेव्हा संस्थेच्या वतीने श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात नव्याने रुजू झालेल्या डॉ. शिंदे यांचा शाल व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्याचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी डॉ. सोमनाथ देवकाते, सुरेश गलांडे, सिराजभाई शेख, प्रताप आल्हाट, गणेश कळसकर, बाळासाहेब पिपाडा, पिपाडा मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. शिंदे यांच्या रुजू झाल्याने ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी व जनसामान्यांसाठी सुलभ होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. 'प्रेरणा अपंग सेवा संस्था' ने या निमित्ताने डॉक्टरांना सन्मानित करून वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाला योग्य तो मान दिला. याच कार्यक्रमात संस्थेने सामाजिक जाणीव जोपासत ११ महापुरुषांच्या प्रतिमा ग्रामीण रुग्णालयास सप्रेम भेट म्हणून दिल्या.

# तलवाडा येथे बालदिनानिमीत्त रांगोळी व मेहंदी स्पर्धा संपन्न

**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

वैजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तलवाडा येथे बाल दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान तर्फे भव्य रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला अतिशय सुरेख आणि नक्षीदार पद्धतीने रांगोळी व मेहंदी ची रचना केली . गीतांजली बोडके हिची उत्कृष्ट रांगोळी म्हणून निवड करण्यात आली व सुमेरा पठाण हिची उत्कृष्ट मेहंदी म्हणून निवड करण्यात आली. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे किशोर पाटिल मगर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व असेच वेगवेगळे उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा,

त्यांना प्रेरणा द्यावी. जेणेकरून त्यांना विविध क्षेत्रात करिअर घडवण्याची संधी मिळेल. शाळा व विद्यार्थी यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते

# सहकाराच्या माध्यमातून भारताची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

**नगर : (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारने सहकार खाते निर्माण करुन सहकाराचे शुध्दीकरण व आधुनिकीकरण करण्याचा मोठा निर्णय घेतला असून त्याची व्याप्ती व प्रगती मोठी आहे. सहकार चळवळीमध्ये महाराष्ट्र राज्य आघाडीवर असून सहकार चळवळीच्या माध्यमातून भारत निश्चीतच आत्मनिर्भर होईल त्या दृष्टीने देशाची वाटचाल चालू असल्याचे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा सहकारी बोर्डाचे मार्गदर्शक भारत सोलेपाटील यांनी केले. आज पंडीत जवाहरलाल नेहरु जन्मदिनी ७२ वा अखिल भारतीय सहकार सप्ताह सहकाराचा ध्वजारोहन श्री. भारत सोलेपाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सहकार गीत गावून



सहकाराला अभिवादन करण्यात आले. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बोर्ड व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांच्या विद्यमानाने १४ नोव्हेंबर २०२५ ते २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अखिल भारतीय सप्ताह कार्यक्रम आयोजीत करण्यात आल्याची माहिती सहकार बोर्डाच्या मुख्य अधिकारी श्रीमती वैजंता मानकर यांनी दिली. या सप्ताह निमित्त राज्यात १४ नोव्हेंबर रोजी कार्यात्मक कार्यक्षमता, जबाबदारी आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी डिजीटलायझेशनला प्रोत्साहन देणे, १५ नोव्हेंबर रोजी त्रिभुवन सहकारी विद्यापीठ संशोधन आणि प्रशिक्षण सहकारी शिक्षणाचे रुपांतर, १६ नोव्हेंबर रोजी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला बळकटी देणे, १७ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय सहकार धोरण परिसंस्था, भारतातील सहकारी संस्थांसाठी संरचित रोडमॅप, १८ नोव्हेंबर रोजी सहकारी उद्योजकतेव्दारे तरुण, महिला आणि हस्तकला, हातकाम, कामगार आणि मत्स्यव्यवसाय यासारख्या दुर्बल घटकांना सक्षम बनवणे १९ नोव्हेंबर रोजी पर्यटन, आरोग्य, हरित उर्जा, प्लॅटफॉर्म को. ऑप, किचन कोऑप आणि इतर कोणत्याही संभाव्य क्षेत्रासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकारी संस्थांचा विस्तार करणे, आणि २० नोव्हेंबर रोजी जागतिक स्पर्धात्मकतेसाठी सहकारी व्यवसाय मॉडेल्समधील नवोपक्रम असे अनेक उपक्रम आयोजीत करण्यात आले असल्याची माहिती बोर्डाच्या मुख्य अधिकारी श्रीमती मानकर यांनी दिली.

# संगमनेर एसटी आगारात वारकऱ्यांशी अरेरावी

■ बस न मिळाल्याने पाच–सहा तास प्रतीक्षा, संतप्त वारकऱ्यांचा अधिकाऱ्याला जाब!



**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर बस स्थानकावर आळंदी व पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना गेली चार ते पाच तास बस न मिळाल्याने मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागले. दरम्यान, एसटीची बस का सोडली जात नाही अशी विचारणा वारकऱ्यांनी केल्यावर संबंधित आगार प्रमुखांनी थेट "डिझेलच नाही, गाडी जाणार नाही... खाजगी गाडी करा, चांगला प्रवास होईल... एसटीने प्रवास कशाला करता?" अशी अरेरावीची भाषा वापरल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या उद्धट प्रतिसादामुळे संतप्त वारकऱ्यांनी थेट अधिकाऱ्याला जाब विचारत, "पगार शासनाचा घ्यायचा आणि खाजगी वाहतुकीची जाहिरात करायची हे कोणत्या अधिकाराने?" असा सवाल उपस्थित केला. वारकऱ्यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडेही संतप्त प्रतिक्रिया नोंदवत असा मुजोर अधिकारी तातडीने गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यात बदलीस का पाठवू नये, अशीही मागणी केली आहे.

विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघालेल्या हजारो भक्तांसाठी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या उद्देशाने सुरू केलेली एसटी सेवा मिळणे अपेक्षित असताना, येथे मात्र "रक्षकच भक्षक झाले की काय?" अशी खंत वारकरी बंधूंनी व्यक्त केली आहे. पंढरपूर व आळंदीच्या मार्गावर वारकरी मोठ्या संख्येने उभे असतानाही बस न सोडणे व त्यावरून अरेरावी करणे हा प्रकार संतापजनक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे हे यात्रेकरूंच्या भेटीसाठी दाखल झाले, वारकऱ्यांच्या अडचणीबाबत त्यांनी प्रशासनाशी चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे एसटी व्यवस्थापनाची कार्यशैली व प्रवाशांशी होत असलेल्या वागणुकीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# आ. विक्रम पाचपुते यांची सावध पवित्रा घेत मोर्चे बांधणी सुरू

## श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजपची रणनीती तयार

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा नगर परिषदेच्या निवडणुकीची रणधुमळी सुरू झाली असून भाजपकडून जोरदार मोर्चे बांधणी सुरू आहे बुधवार दिनांक १२ रोजी कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली त्यामध्ये असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीत भाजपची ताकद वाढली आहे नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार निश्चित असतानाही कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसत असून जोरदार इनमिंग सुरू आहे

आमदार विक्रम पाचपुते म्हणाले शहरांमध्ये जन चाचणी सुरू आहे त्यात ज्याचे नाव अवल येईल त्यालाच भारतीय जनता पार्टी उमेदवाराची संधी देण्यात येईल,भारतीय जनता पार्टी प्रत्येक गोष्टीची नोंद ठेवणार मला पक्ष आहे आगामी निवडणुकीत बेरजेचे राजकारण करताना वजाबाकी होऊ देणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम केले तर श्रीगोंदा नगरपरिषद व पुन्हा एकदा भाजपचा झेंडा फडकला जाईल असे त्यांनी यावेळी नमूद केले

या कार्यक्रमास माजी मंत्री बबनराव पाचपुते परिक्रमाच्या अध्यक्षा प्रतिभाताई पाचपुते आमदार विक्रम पाचपुते ज्येष्ठ नेते पोपट आबा खेतमाळीस पक्ष निरीक्षक बाळासाहेब महाडिक तसेच उपाध्यक्ष संदीप नागवडे सर उपस्थित होते.

यावेळी असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला त्यामध्ये माजी नगराध्यक्ष सुनीता शिंदे मच्छिंद्र शिंदे माजी उपनगराध्यक्ष राजू गोरे अर्चना गोरे माजी नगरसेवक प्रशांत गोरे सीमा गोरे सागर गोरे सतीश मखरे संगीता मखरे निवृत्त पोलीस अधिकारी कांतीलाल कोथिंबिरे जमीर जकाते, लक्ष्मण कोथिंबीरे भाऊसाहेब खेतमाळीस विकास



बोरुडे यांच्यासह असंख्य युवा व महिला कार्यकर्त्यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम केले तर श्रीगोंदा नगर परिषदेवर पुन्हा एकदा भाजपचा झेंडा फडकला जाईल नव्या प्रवेशामुळे भाजपची ताकद वाढली असून या प्रवेशामुळे नगरपरिषदेतील भाजपाचे संघटना ताकद आणि मनोबलता लक्षणे वाढ झाल्याचे पक्षातील वरिष्ठ कार्यकर्त्यांनी नमूद केले

याप्रसंगी तालुका अध्यक्ष डॉक्टर विक्रम भोसले अजित काकडे मीडिया अध्यक्ष राजेंद्र उकाडे शहराध्यक्ष धनंजय कोथिंबिरी माजी नगरसेवक बापूशेठ गोरे नानासाहेब कोथिंबिरे युवा नेते रमेश गिरमकर अल्पसंख्यांक सेलचे अकिल इनामदार मिलिंद दरेकर शकूर शेख आदी मान्यवर उपस्थित होते तसेच बैठकीस मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# रेणुका नामवाडे यांना पंजाबची पदवी



**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाब मधुन रेणुका शेषेराव नामवाडे , (काकडे ) यांनी वेगवेगळ्या परतसाठा व्यवस्थापन प्रतिमानाचा अभ्यास या विषयावर प्रबंध सादर केला असून विद्यापीठाने सदरील विषयास मान्यता दिली असून या बद्दल परिवारातील सदस्य, मित्र मंडळ यांनी अभिनंदन केले आहे. मार्गदर्शक प्राध्यापक डॉ.नितीन कुमार मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंध सादर करण्यात आला आहे. २५ ऑक्टोबर २५ प्रबंध सादर करण्यात आला होता. १२ संशोधन पेपर सादर केले होते, त्यापैकी ५ हे SCOPUS मानांकन यादीत नमुद झाले असून त्याचा निकाल २८ ऑक्टोबर रोजी मान्यता दिली असून, गेल्या चार वर्षांपासून ह्या प्रबंध सादर करण्यासाठी अभ्यास केला. रेणुका ह्या MSc Mathematics, Physics,PGDS, MH-SET, B.ed, TAIT, GATE असे शिक्षण लग्नानंतर पूर्ण केले आहे यात त्यांचे पती संतोष काकडे आणि सासरे दादाराव काकडे, वडील शेषराव नामवाडे यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली, सध्या गुरु नानक विद्यान महाविद्यालय, बल्लारपूर येथे कार्यरत आहेत,तर सिडको औद्योगिक वसाहतीतील उद्योजक शेषेराव नामवाडे यांच्या त्या कन्या आहेत. शालेय शिक्षण हे शिवाजी विद्यालय सिडको, आणि B.Sc इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको आणि M.Sc द्न्यानोपासक महाविद्यालय परभणी येथून पूर्ण झाले. उप कुलगुरू जसपाल सिंग संधू यांनी या प्रबंधकास मान्यता दिली आहे. संबंधित युनिव्हर्सिटी ही देशातील पहिल्या पाच मध्ये समावेश असून नॅक चे अ++ मानांकन आहे. आमचे स्नेही तथा उद्योजक शेषेराव नामवाडे यांची मुलगी रेणुका नामवाडे काकडे यांच्या प्रबंधकास लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाबाने मान्यता दिल्याबद्दल नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रमेश ठाकूर , अनिल पाटील धमणे, सारंग नेरलकर,जाधव यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड झाल्याबद्दल महिला काँग्रेसच्या वतीने त्यांचा सत्कार करताना जिल्हाध्यक्ष योगिता राजळे समवेत शहराध्यक्ष नलिनी गायकवाड, रजनी ताठे, ज्ञानेश्वरी कोठावळे, पूनम मुंगसे ,लता शितोळे ,मीरा रोकडे, सुवर्णा घाडगे ,एड मोनाली अहिरे आदी.

## थोडक्यात बातम्या...

### शनिवारवाड्यापासून धडकणार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

नांदेड (स. गांवकरी) : माध्यमिक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी सातत्याने पत्रव्यवहार करून देखील शिक्षण संचालकाने कायम दुर्लक्ष केले आहे. या विरुद्ध आता पुण्याच्या शनिवारवाड्यापासून शिक्षण संचालक कार्यालयावर बेधडक मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष सरिता पाळजकर- साकळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. न्यायालयीन आदेशानंतर सुरू करण्यात आलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून बंद केली आहे. या प्रमुख मागणीसह अन्य बारा मागण्या संदर्भात आयुक्तांना जाब विचारण्यासाठी पुणे येथील शनिवारवाड्यापासून 17 नोव्हेंबर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन राज्य उपाध्यक्षा सरिता पाळजकर साकळकर , जिल्हाध्यक्ष गोपाळ पेंडकर, प्रकाश देशमुख, फारूक सर आदींनी केले आहे.

### ‘जागतिक मधुमेह दिन’ उत्साहात साजरा

भोकर (स. गांवकरी) : ग्रामीण रुग्णालय, भोकर येथे १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ‘जागतिक मधुमेह दिन’ विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यंदाचे घोषवाक्य “आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यातील मधुमेहाची काळजी” असे असून, रुग्ण व नातेवाईकांना मधुमेहाची लक्षणे, कारणे, प्रतिबंधक उपाय, तपासणीचे महत्त्व व उपलब्ध उपचार पद्धती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संतुलित आहार, नियमित व्यायाम, वजन नियंत्रण व वेळेवर औषधोपचार यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमास एनसीडी वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर रेड्डी, आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक थोरवट, औषध निर्माण अधिकारी मल्हार मोरे, एनसीडी अधिपरिचारिका श्रीमती भालेराव, एनसीडी समुपदेशक रेणुका भिसे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

### नामनिर्देशन प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद

किनवट (स. गांवकरी) : दि. १४ किनवट नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रक्रियेला आज अधिकृत गती मिळाली. नामनिर्देशन दाखल करण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यात एकूण १७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल करूण निवडणुकीच्या शर्यतीत प्रवेश केला. अखेर ११ तारखेपासून सुरू झालेल्या नामनिर्देशन प्रक्रियेत आज दि. १४ नोव्हेंबर रोजी उमेदवार आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. नगर परिषद कार्यालय परिसरात सकाळपासूनच निवडणुकीचा माहोल चांगलाच रंगलेला दिसत होता. नगराध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज; स्पर्धेची उत्सुकता वाढली , नगराध्यक्ष पदासाठी नेम्मानीवार अनुजा किरणकुमार यांनी एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल केला आहे. महिलांना दिलेल्या आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर या जागेवर कोण उमेदवार उतरणार, याविषयी गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चा होती. अखेर आज अनुजा किरणकुमार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर या पदाची स्पर्धा कोणत्या दिशेने जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगरपरिषदेकडे असलेल्या १६ नगरसेवक पदांसाठी विविध प्रभागांतून उमेदवारांनी अर्ज दाखल केले. काही प्रभागांत एकापेक्षा जास्त उमेदवारांनी नामनिर्देशन केल्याने पुढील चुरस वाढण्याची चिन्हे आहेत.

### नगराध्यक्ष पदासाठी ऐक तर नगरसेवक पदासाठी सात उमेदवारी अर्ज दाखल

कंधार (स. गांवकरी) : कंधार नगरपालिका निवडणुकीसाठी शुक्रवारी दि.१४ नोव्हेंबर रोजी ७ उमेदवारांनी नगरसेवक पदासाठी अर्ज भरले आहे. तर नगराध्यक्ष पदासाठी ऐक उमेदवारी अर्ज आले असल्याचे माहिती दिली आहे. दि १३ रोजी गुरुवारी , नगरसेवक पदासाठी तीन उमेदवारांनी अर्ज केला होता, एकूण नगरसेवक पदासाठी १० असे तर नगराध्यक्ष पदासाठी एक उमेदवारांनी अर्ज आल्याची माहिती दिली आहे. कंधार नगरपालिका नगरसेवक पदासाठी अर्ज दि . १३ व १४ रोजी प्रभात क्रमांक १, अ, १ उमेदवार , ब, ३ , प्रभाग क्रमांक ४, जागा १ ,अ, क्रमांक १, ब , प्रभाग क्रमांक ६ जागा ,अ, १ प्रभाग क्रमांक ७ जागा,अ, १,ब, १प्रभाग क्रमांक १० जागा ब, १ व नगराध्यक्ष पदासाठी एक जागा ,एकूण नगरसेवक पदासाठी १० अर्ज प्राप्त झाले आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अधिकारी रामेश्वर गोरे यांनी दिली आहे.

# विद्यार्थी गुणवत्ता वाढ उपक्रम शिक्षक आपल्या दारी २३ वर्षे पूर्ण

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर गेली २३ वर्ष शिक्षक आपल्या दारी हा उपक्रम इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी सातत्य पूर्ण राबवित आहे.जिल्ह्यातील अनेक शाळांसाठी विद्यालयाचा हा उपक्रम मार्गदर्शक ठरला आहे. विद्यालयात दिनांक ११ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर या कालावधीत शिक्षक,पालक व विद्यार्थी सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर माहिती देताना म्हणाल्या की, दरवर्षी या सहविचार सभा संध्याकाळी वाडी -वस्त्यांवर पालकांच्या घरी प्रत्यक्ष जाऊन आयोजित केल्या जातात परंतू परिसरात बिबट्यांचा वावर व होणारे हल्ले पाहता



यावर्षी या सभा विद्याल- यातच आयोजित केल्या आहेत.

या सहविचार सभेत इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांना प्रथम सत्र परीक्षेत मिळालेल्या गुणांचे वाचन केले जाते विद्यार्थ्यांचे पालक,शिक्षक यांच्यात सकारात्मक चर्चा होते.विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी काय प्रयत्न करता येतील,विषयांतील गुण वाढविण्यासाठी काय करावे आदी प्रकारचे मार्गदर्शन केले जाते. यामुळे दरवर्षी विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये वाढ होऊन विद्यालयाचा शेकडा निकाल चांगला लागत आहे.ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे,सहसचिव पंकज घोलप,मुख्याध्यापिका राजश्री भालेकर,संजय हिरे,अनिल उकिरडे ,भाऊसाहेब खाडे यांनी पालक व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना ते म्हणाले की,पाठ्यपुस्तक वाचनावर भर द्यावा,प्रश्नपत्रिकांचा सोडविण्याचा सराव अधिकाधिक आवश्यक न जमणाऱ्या गोष्टींना सकारात्मकपणे स्वीकारून स्वतःमध्ये अपेक्षित बदल करावा,मोबाईलचा वापर पूर्णपणे बंद करावा,वाचन लेखन तसेच गणिताचा सराव वाढवावा,विषयानुसार अभ्यासाचे नियोजन करावे,घरातील वातावरण अभ्यासाला पोषक असे पालकांनी ठेवावे,पालकांनी विद्यार्थ्यांचे मित्र बनवून त्यांच्या अडचणी सोडवाव्यात गुणात्मक आलेख चढता राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनलावून,एकाग्रतेने व आत्मविश्वासपूर्व अभ्यास करावा,बुद्धिमत्ता ही कोणत्याही एका समाजाची मक्तेदारी नाही. विद्यार्थ्यांनी सर्वस्व झोकून अभ्यास केला तर कोणालाही यश शक्य आहे.या उपक्रमाबद्दल पालकांनी विद्यालयाचे आभार मानले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढून नक्कीच विद्यार्थी येणाऱ्या परीक्षेमध्ये चांगल्या प्रकारचे यश संपादन करतील त्यासाठी आम्ही सर्व पालक सहकार्य करू असे आश्वासन सर्व पालकांच्या वतीने कुसुम जरे,सचिन ओतूरकर,शेखर खेत्री,मनोहर वामन,योगेश इंगळे , रेखा मुरादे,शबाना मुजावर,प्रकाश डुंबरे,विकास ढोबळे,सारीका शेटे,दिपक फापाळे यांनी दिले.

येणाऱ्या परीक्षेत चांगल्या प्रकारचे यश संपादन करून विद्यालयाचे व पालकांचे नाव उज्वल करू व शिक्षक अतिशय चांगल्या प्रकारे आम्हा सर्व विद्यार्थ्यां ना मार्गदर्शन करत आहेत असे मनोगत श्रेया जरे ,वैभवी डुंबरे ,चैतन्य ओतूरकर,आदिती ढमाले,प्रणव तांबे,स्वरा ढमाले यांनी व्यक्त केले.

याउपक्रमात अजित डांगे,भगवंता घोडे,संतोष कांबळे,विशाल चौधरी, मिलिंद खेत्री,लक्ष्मण दुडे,संतोष सोनवणे,अमित झरेकर,मंगेश तांबे,विजया गडगे,सोनाली माळवे, शिल्पा भालेराव,सोनाली कांबळे,आसावरी गायकर, वनिता भोर,देवचंद नेहे,दिनेश ताठे,अनिल जवरे, रसिका शेळके,सरस्वती भताने,रंजिता पाटील,ईश्वर ढमाले,प्रसन्न तांबे,योगेश फापाळे,अरविंद आंबरे सहभागी झाले व मार्गदर्शन केले.

# अवैध दारू विक्री बंद करावी, पोलीस अधीक्षक यांना निवेदन

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील मौजे बळेगाव येथे विनापरवाना अनाधिकृत रीत्या दारू विक्री करणाऱ्या सदर गावातील चार पाच व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करून कायमची दारू विक्री बंद करण्यात यावी असे तक्रारी निवेदन सामाजिक कार्यकर्ते देविदास पांडुरंग गायकवाड यांनी पोलीस अधीक्षक नांदेड याच्यासह वरिष्ठाकडे दिले आहे. स्वाभिमानाने जीवन जगावे असे ग्रामीण भागातील लोकांना वाटत असले तरी चंदनाच्या झाडाला जसे विषारी सापाने विळका घालावा तसे गावातील प्रमाणिक चांगल्या व्यक्तीच्या कुटुंबाला गाव गुंडाकडून अवैध दारू दुकानाचा विळखा मौजे बळेगाव येथे पडलेला आहे गावात चार ते पाच व्यक्तीकडून अवैधरित्या दारू विक्री सर्रासपणे होत असल्याची तक्रारी निवेदन निवेदनकर्त्याने दिली आहे या अवैध दारू विक्रीमुळे गावातील तळीराम यांचा महिलांना नाहक त्रास होत आहे घाणेरड्या शब्दात अश्लील भाषेत शिवीगाळ करणारे दारुड्यांचा बंदोबस्त तर झालाच पाहिजे परंतु विनापरवाना अवैधरित्या दारू विक्री कायमची बंद करण्यात यावी व हा व्यवसाय करणाऱ्या चार-पाच व्यक्ती विरुद्ध योग्य ती कार्यवाही करावी.

# सर्व यंत्रणांनी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली कार्यान्वित करावी

- कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

सिंहस्थ कुंभमेळा 2027 मधील सर्व प्रकल्पांचे नियोजन, देखरेख आणि प्रगती तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली तयार करण्यात आली असून या प्रणालीमुळे सर्व कामांचे एकाच ठिकाणी निरीक्षण आणि नियंत्रण करता येणे शक्य होणार आहे. ही प्रणाली वापरण्यास सुलभ आणि उपयुक्त असून सर्व यंत्रणांनी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली कार्यान्वित करावी, अशा सूचना कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या. कुंभमेळा प्राधिकरणामार्फत



जिल्हा परिषदेच्या सभागृहात प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणालीत (PMIS) डेटा अद्ययावत करणेबाबत आयोजित प्रशिक्षण सत्रात आयुक्त श्री. सिंह बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करीष्मा नायर व सर्व यंत्रणांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. आयुक्त श्री. सिंह म्हणाले की, या डिजिटल प्रणालीत सर्व यंत्रणांना नवीन वापरकर्ते आणि संस्था जोडणे, माहिती बदलणे आणि त्यांना आवश्यक अधिकार देणे शक्य होणार आहे. यात नवीन प्रकल्पांची माहिती, नवीन प्रकल्पांची माहिती भरणे, अद्ययावत करणे, त्यातील कामांची यादी आणि पूर्ण होण्याच्या तारखा ठरविणे तसेच त्यांचे टप्पे व देयकांच्या टप्प्यांची माहिती नोंदविता येणार आहे. प्रकल्प किती टक्के पूर्ण झाला व त्याला टप्प्यानुसार लागलेला खर्च दर्शविता येणार आहे. तसेच प्रगती अहवाल दाखविण्यासाठी छायाचित्रे व व्हिडिओ अपलोड करता येणे यासह विभागाने दिलेल्या निरीक्षणांची नोंद पाहता येणार आहे. यात प्रकल्पा संदर्भातील अडचणी, अडथळे व इतर विभागांकडील प्रलंबित मुद्द्यांची नोंद करणे व त्याबाबत स्मरण करून देणे या सुविधा उपलब्ध आहेत.

# कंधार नगरपालिकेचा काँग्रेस पक्षाचा नगराध्यक्ष एकच चेहरा का ?

- काँग्रेस पक्षामध्ये ज्येष्ठ नेत्यांना संधी नाही
- काँगेस पक्षाचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार नवीन चेहरा द्या शहरामध्ये मागणी
- चौधरी यांची महत्त्वाची भूमिका जनतेमधून काँग्रेसचा नगराध्यक्ष विजय झाला

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार शहरात नगरपालिकाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेते मंडळी सक्रिय झाले असून अनेक उमेदवार निवडुक रिंगणात असल्याचे सांगले जात आहे. काँग्रेस पक्षाकडून नवीन चेहरा देण्यात यावा अशी मागणी जनतेमधून होत आहे . गेल्या अनेक वर्षापासून नगराध्यक्ष पद एकाच परिवारामध्ये का ?काँग्रेस पक्षामध्ये ज्येष्ठ नगरसेवक असून सुद्धा काँग्रेस पक्षाकडून भूमिका काय ?याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे. काँग्रेस पक्षामध्ये चार चार टर्म नगरसेवक पदावर व उपनगराध्यक्ष पदावर असून सुद्धा त्यांना आजपर्यंत नगराध्यक्ष पदाची संधी दिली नाही आता संधी आली तर त्यांना काँग्रेस पक्ष नाकारत आहे. त्यासाठी नवीन चेहरा देण्यात यावा यासाठी सर्वसामान्य मध्ये चर्चा होत आहे. कंधार शहर काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून बघितल्या जाते बालेकिल्ल्यांमध्ये काँग्रेस पक्षाचे मतदान सर्वात जास्त असून यावेळी नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नवीन चेहऱ्यांना संधी द्यावी एकाच परिवारातील पुन्हा पुन्हा तेच नगराध्यक्ष पद नको यासाठी सर्वसामान्य मध्ये चर्चा ना उधाण आले आहे ,काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना संधी देण्यात यावी पण पक्षाची भूमिका काय आहे. विस विस वर्ष नगरसेवक पदावर असलेले व काँग्रेस पक्षामध्ये अनेक नगरसेवक उपनगराध्यक्ष असून लोकसभा .असो विधानसभा, जिल्हा परिषद ,पंचायत समिती आसो ,नगरपालिका निवडणुकीमध्ये महत्वाची भूमिका बजवणाऱ्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना व कार्यकर्त्यांना बाजूला करून व त्यांना डावळुन काँग्रेसच्या नेत्यांना विश्वासात न घेता नगराध्यक्ष पद घोषित करणारे हे कोण ? अशी ही चर्चा काँग्रेसच्या काही ज्येष्ठ नेत्याकडून होत आहेत.

# युवा शेतकऱ्यांची कर्जाला कंटाळून आत्महत्या

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

सततच्या नापिकीमुळे डोक्यावर कर्जाचे ओझे झाल्यामुळे सगरोळी येथील युवा अल्पभूधारक शेतकऱ्यांने विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना सगरोळी येथे घडली असून यामुळे गावावर शोककळा पसरली आहे. मागील काही वर्षापासून नैसर्गिक प्रकोपामुळे शेतकऱ्यांवर ना पिकीचे संकट कोसळत असून यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून या नैसर्गिक संकटाच्या नापिकीमुळे डोक्यावर कर्जाचे ओझे झाल्यामुळे या नैराश्यातुन सगरोळी येथील अल्पभूधारक युवा शेतकरी माधव रामलु चुन्नमवार वय वर्षे ३९ हे कर्जबाजारी पणाला कंटाळून गेल्या दोन दिवसा पुर्वी विषारी औषध पिल्यामुळे त्यास शेजारी तेलंगना राज्यातील निजामाबाद येथे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार चालु आसताना आज ता. १४ डिसेंबर रोजी पहाटे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# चांगल्या भावासाठी शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे : आमदार नितीन पवार

## 'कृषीथॉन २०२५' मध्ये परिसंवादासह पुरस्कार प्रदान

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे. त्यामुळे चांगल्या दर्जाचे पीक येते व या पिकास चांगला भाव मिळतो. आता हवामान बदलाचा परिणाम पिकांवर होत आहे. हीच स्थिती कायम राहू शकते, असे प्रतिपादन आमदार नितीन पवार यांनी केले. अग्रगण्य कृषी प्रदर्शन 'कृषीथॉन २०२५' हे प्रदर्शन १३ ते १७ नोव्हेंबर दरम्यान ठक्कर डोम, ए.बी.बी. सर्कलजवळ भरलेले आहे. यात शुक्रवारी शेतकऱ्यांना पुरस्कार वितरण प्रसंगी आमदार पवार बोलत होते.

शुक्रवारी (दि.१४) डिजिटल शेती - संधी आणि आव्हाने या विषयावर परिसंवाद झाला. यात कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेचे, डेटा एनालिटिक्ससह ड्रोन तंत्रज्ञान यांचे संभाव्य उपयोग आणि महाॲग्री-एआय धोरण यावर चर्चा झाली. परिसंवादात विभागीय महाव्यवस्थापक अनंत अग्निहोत्री (नाशिक विभागीय कार्यालय, महाऊर्जा), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, फलोत्पादन विभागाचे सेवानिवृत्त संचालक कैलास मोते (कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र), अक्षय निकम, समाधान शिंदे हे सहभागी होते. तसेच कृषी उद्योजक व प्रगतशील शेतकरी पुरस्कारांचे वितरण हि या सत्रात झाले. याप्रसंगी आयोजक संजय न्याहारकर, सहआयोजक साहील न्याहारकर, अश्विनी न्याहारकर, अंकिता न्याहारकर, नितीन मराठे उपस्थित होते.

या परिसंवादात शेतीतील उत्पादन खर्च कमी करण्यासह मार्केटची सखोल माहिती होण्यासाठी शेतकऱ्यांनी डिजिटल शेतीचा अवलंब करावा. त्यासाठीचे एआय तंत्रज्ञानही उपलब्ध आहे. सोबतच डिजिटल शेतीसाठी शासनाचेही पाठबळ आहे, असा सूर कृषी क्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी काढला.




यावेळी तज्ज्ञांनी मत व्यक्त केले की, तंत्रज्ञानात मोठे बदल झाले आहेत. आता सॅटेलाईटद्वारे पिकाची पाहणी करता येते. महाविस्तार एआय ॲप शेतकऱ्यांना उपयुक्त आहे. चॅटबॉट प्रश्नोत्तरांसाठी आहे. निरक्षर शेतकऱ्यांसाठी आता बोलून प्रश्न विचारणे व त्यावर ऑडीओ स्वरूपात उत्तर असे डिजिटल स्वरूपात तंत्रज्ञान उपलब्ध आहे. स्वयंचलित यंत्रणा शेतीसाठी मिळत आहे. सोलर उर्जेच्या सहाय्याने तंत्रज्ञान वापरले जात आहे. याने पाणीपुरवठा सहज झाला आहे. सोलर कुंपणही वापरले जात आहे. यात प्राण्यांना नुकसान होत नाही व त्यांचा त्रासही टळतो. ड्रोनचा वापर केल्यास वाढलेल्या पिकात साप व जंगली प्राण्यांचा धोका टाळणे शक्य होते. ड्रोन कीटकनाशक फवारणी करत असल्याने शेतकऱ्यांचा कीटकनाशकाशी संपर्क येत नाही. सेन्सर तंत्रज्ञानाने हवामान अंदाज शेतीवरच येतो.

दुपारच्या सत्रात टोमॅटो, कांदा, भाजीपाला सद्यस्थिती, अर्थकारण व भविष्यातील वाटचाल या विषयावर परिसंवाद झाला. याप्रसंगी पाहुणे म्हणून आमदार नितीन पवार उपस्थित होते. परिसंवादात विभागीय कृषी अधीक्षक अधिकारी संभाजी ठाकूर, विएनआर सीड्स प्रा. ली.चे बिजनेस मॅनेजर प्रशांत रावत, हवामान अभ्यासक दीपक पवार,ॲग्रीप्लास्ट टेकचे ग्रोथ मॅनेजर अभिनव रॉय सहभागी होते. अंकिता न्याहारकर यांनी स्वागत केले. साहिल न्याहारकर यांनी प्रास्ताविक केले.

या परिसंवादात टोमॅटो, कांदा या भाजीपाला पिकांचे उत्पादनात सद्य स्थितीत शेतकरी बांधवांना उद्भवणारे समस्यांवर मार्गदर्शन, सप्लाय, डिमांड, मार्केट, प्रोसेसिंगवर चर्चा झाली. तज्ज्ञांनी याप्रसंगी सांगितले की, हवामानाचा पॅटर्न आता बदलला आहे. पाऊस आता मे मध्येही पडू शकतो. त्यामुळे शेतीचे नियोजन जाणीवपूर्वक करावे. रोपे बलवान लावावीत. जेणेकरून ते येणाऱ्या संकटांना तोंड देऊ शकतात. ग्राफ्टिंग व मल्चिंग पेपरचा वापर करावा. खर्च आटोक्यात ठेवावा. कारण पुढे काय होईल, हे सांगता येत नाही.

# गर्भधारणापूर्व आरोग्य व सुरक्षित मातृत्वाचा संदेश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अ‍ॅन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (फॉग्सी) आणि पुणे ऑब्स्टेट्रिक अ‍ॅन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) यांच्या सहयोगाने संपूर्णा पब्लिक फोरम उपक्रमा अंतर्गत् गर्भधारणापूर्व आरोग्याविषयी जनजागृती करणारा विशेष कार्यक्रम गुरूवारी,आयएमए हॉल, टिळक रोड येथे पार पडला. गर्भधारणेपूर्वीच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि निरोगी गर्भधारणा व सुरक्षित मातृत्वाला प्रोत्साहन देणे हा या समाजाभिमुख उपक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमाचे नेतृत्व फॉग्सीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.सुनिता तांदुळवाडकर यांनी केले. प्रसिध्द अभिनेत्री मृण्मयी देशपांडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी पीओजीएसचे अध्यक्ष डॉ.मनिष माचवे, फॉग्सीच्या राष्ट्रीय सह सचिव डॉ.अश्विनी काळे,पीओजीएसचे सचिव डॉ.निलेश बलकवडे,डॉ पूजा लोढा (आयोजक सचिव), कार्यक्रमाचे संयोजक डॉ.वैजयंती पटवर्धन, डॉ.रेवती राणे तसेच समन्वयक डॉ.आरती निमकर,डॉ अलका क्षीरसागर, डॉ.अलका कुथे आदी मान्यवर उपस्थित होते.



ज्ञान,सर्जनशीलता व सामाजिक बांधिलकीचा मिलाफ असलेल्या या कार्यक्रमात तज्ञ डॉक्टर,आरोग्य क्षेत्रातील व्यक्ती आणि समुदाय सदस्य सहभागी झाले होते. डॉ.सुनिता तांदुळवाडकर म्हणाल्या की, गर्भधारणेपूर्व घेतलेली काळजी ही आरोग्यदायी प्रसूतीच्या दिशेने पहिले पाऊल आहे. प्रत्येक गर्भधारणापूर्वी योग्य नियोजन करणे महत्त्वाचे आहे. वजन, हिमोग्लोबिन,रक्तदाब,रक्तातील साखरेचे प्रमाण,थायरॉईड यासारख्या चाचण्या गर्भधारणापूर्व नियोजनावेळी होणे आवश्यक आहे. संपूर्णा उपक्रमाद्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचून आरोग्य व कल्याणाबाबत जागरूकता निर्माण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.



मंचर : पारगाव ता.आंबेगाव येथील दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयात बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. वळसे पाटील महाविद्यालयात 14 नोव्हेंबर हा दिवस पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ.प्रा.नाथा रामभाऊ मोकाटे यांनी प्रतिमा पूजन करून सर्वांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.प्राध्यापक,प्राध्यापकेइतर कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी कान्होबा महादेव डोंगरे, उपसभापतीपदी सोपान अर्जुन सैद, खजिनदारपदी बाळासाहेब भिमाजी साबळे, तर मानद सचिवपदी सखाराम हनुमंत मुंजाळ यांची बिनविरोध निवड मंचर येथील मुख्य कार्यालयात करण्यात आली.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. निवड प्रक्रिया पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, मंचर येथील सभागृहात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एम.एस.चौधरी यांनी काम पाहिले.प्रत्येक पदासाठी एकच अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक प्रक्रिया बिनविरोध घोषित करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमास प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा उपाध्यक्ष नंदकुमार चासकर, जिल्हा प्रतिनिधी विजय वळसे पाटील, तालुका संघाचे अध्यक्ष सचिन तोडकर, माजी सभापती मंगेश जावळे, तालुका सरचिटणीस सुनिल भेके, विजय डोके, संचालक संजय कैंगले, दत्तात्रय मेचकर, बाबाजी गाढवे, भास्कर चासकर, संतोष लबडे, अभिजीत नाटे, बाळासाहेब सैद, मिनाक्षी वळसे पाटील, सुरेखा तोडकर, संतोष पोखरकर, विकास बाणखेले आदी मान्यवर उपस्थित होते.संस्थेच्या मंचर व घोडेगाव येथील आधुनिक कार्यालयीन इमारती, सीसीटीव्ही, अद्ययावत फर्निचर, स्वतंत्र कक्ष, सभासदांसाठी एसएमएस व मोबाईल अ‍ॅप सुविधा, क्युआर कोडद्वारे ऑनलाईन व्यवहार, तसेच शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार अशी उपक्रमांची परंपरा असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



### शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. खिलारी व उपाध्यक्ष पूनम बांगर

मंचर (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भराडी ता.आंबेगाव येथिल शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी डॉ.सचिन खिलारी व उपाध्यक्ष पूनम बांगर यांची बिनविरोध निवड केली.उद्योजक गोविंदशेठ खिलारी आणि मान्यवरांच्या हस्ते शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. उद्योजक गोविंदशेठ खिलारी,रमेश भाऊ खिलारी,कविता गुंजाळ,पुनम बांगर,सायली पवार, जितेंद्र गावडे,अमोल कुरकुटे,मारुती पोखरकर,सचिन खिलारी,सागर कुरकुटे, शिक्षणतज्ञ प्रकाश छगन गोफणे, शिक्षक प्रतिनिधी खंडू हनुमंत येवले या सदस्यांनी एकमताने अध्यक्ष,उपाध्यक्ष यांची बिनविरोध निवड केली.यावेळी शुभांगी खिलारी,ज्योती राजगुरू,वैभव खिलारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.अध्यक्ष व उपाध्यक्षांचा शाळा व्यवस्थापन समितीच्या सचिव मीनाक्षी संतोष वळसे पाटील,गोविंदशेठ खिलारी यांनी सत्कार केला.उद्योजक गोविंदशेठ खिलारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा व्यवस्थापन समितीची कार्यकारणी योग्य कामगिरी पार पाडेल.अशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सचिन खिलारी यानी दिली.

### मंचर निवडणुकीत उमेदवारांच्या पवित्र्यामुळे युती-आघाडी समोर पेच



मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही पातळ्यांवर उमेदवार ठरवताना मोठा पेच निर्माण झाला आहे."आघाडी किंवा युती झाली तर आम्हीच लढू" असा ठाम पवित्रा काही इच्छुक उमेदवारांनी घेतल्याने प्रमुख नेत्यांपुढे डोकेदुखी निर्माण झाली आहे. पक्षाने अधिकृत उमेदवारी न दिल्यास बंडखोरी करण्याची तयारी अनेकांनी दाखवली असून त्यामुळे अंतर्गत कलह उफाळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही इच्छुक उमेदवारांनी स्वतंत्रपणे उमेदवारी दाखल करण्याचे संकेत दिल्याने राजकीय वातावरण तापले आहे.अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची मानसिकता बहुतांश इच्छुकांमध्ये नसल्याचे स्पष्ट होत असले तरी आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवण्यासाठी ते शेवटपर्यंत प्रयत्नशील राहतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.दरम्यान, महायुती आणि महाविकास आघाडीतील समन्वयक नेते उमेदवारांमध्ये समन्वय साधण्यासाठी प्रयत्न करत असून अंतर्गत नाराजी दूर करण्याची धडपड सुरू आहे. मंचर नगरपंचायतीची निवडणूक रंगात आली असून तसतशी राजकीय समीकरणं अधिक गुंतागुंतीची बनत चालली आहेत.

## वसुंधरा अकॅडेमीत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन, बालदिन व वीर बिरसा मुंडा जयंती उत्साहात संपन्न

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अभिनव शिक्षण संस्था,अकोले संचलित वसुंधरा अकॅडेमीत वार्षिक क्रीडा महोत्सव २०२४-२५* चा उद्‌घाटन सोहळा तसेच बालदिन व वीर बिरसा मुंडा जयंती जल्लोषात संपन्न. अकोले तालुका नगरपंचायतच्या कार्यकारी अधिकारी मा. धनश्री पवार, राजूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. किशोर पवार, अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष, कॅम्पस डायरेक्टर तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख , उपप्राचार्य राधिका नवले, एमबीए विभागाचे प्रमुख शोएब शेख यांच्या शुभहस्ते व अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. अकोले नगरपंचायत कार्यकारी अधिकारी मा. धनश्री पवार यांच्या हस्ते क्रीडा ध्वजाचे आरोहण करण्यात आले. त्यांनतर ध्रुवराज धुमाळ, आयुष लहामगे, सार्थक तळपे, समीक्षा बांबले, स्नेहल शेटे, अक्षिका लांडगे या विद्यार्थ्यांनी आणलेली क्रीडाज्योत मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली व मान्यवरांच्या हस्ते Reach High असा संदेश देणाऱ्या रंगीबेरंगी फुग्यांचा गुच्छ हवेत सोडून स्पर्धांचे उद्‌घाटन झाले. यानंतर वसुंधरा अकॅडेमीच्या सफायर द ब्लू, एमराल्ड द ग्रीन, रुबी द रेड व डायमंड द येलो या चारही हाऊसने परेड कमांडर श्वेता कानकाटे हिच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट परेड संचालन करत कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांनतर स्कूल कॅप्टन अक्षिका लांडगे व व्हॉइस स्कूल कॅप्टन तक्ष शहा यांच्या नेतृत्त्वाखाली सर्व कॅप्टन्स, प्रिफेक्ट्स व विद्यार्थी यांनी क्रीडा प्रतिज्ञा घेतली. पंडित जवाहरलाल नेहरू, वीर बिरसा मुंडा व राघोजी भांगरे यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून त्यांना वंदन केले. शाळेच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा महोत्सवात सहभागी होऊन खेळण्याचा व स्पर्धांचा आनंद घ्या असं संदेश देत सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.



याप्रसंगी वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, समूहनृत्य, बिरसा मुंडा यांचा जीवन परिचय करून देणारी नाटिका व समूह नृत्य तसेच योग प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रमुख अतिथी मा. धनश्री पवार आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या विविध खेळ आपल्याला संघकार्य, नेतृत्व, जबाबदारी, संयम आणि आत्मविश्वास शिकवतात. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण समर्थ बनतो. खेळ आपल्या जीवनातील अविभाज्य घटक आहे.

तर राजूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी समूहनृत्य, समूहगीत, योग प्रात्यक्षिके अत्यंत सुंदर पद्धतीने सादर करून आपल्यामध्ये असलेल्या कलागुणांचे अत्यंत सुंदर प्रदर्शन केले व हे दाखवून दिले की शाळा म्हणजे केवळ अभ्यास नव्हे तर सर्वच ॲक्टिव्हिटी मध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

क्रीडाशिक्षक गोरक्षनाथ पोपरे यांनी सर्व क्रीडा स्पर्धांचे नियोजन केले तर उद्‌घाटन समारंभाचे संयोजक म्हणून इंद्रभान कोल्हाळ यांनी काम पाहिले.

शितल तळेकर, बबन शिंदे, माधुरी गोसावी तसेच सर्व शिक्षकांनी शाळेचा कॅम्पस सुंदर सुशोभित केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी खूप मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका प्राजक्ता सोलापुरे व विद्यार्थिनी क्रीशा शेवाळे व तेजस्विनी वलवे यांनी केले.

## सावध राहा – सुरक्षित डिजिटल व्यवहारांसाठी स्मार्ट पद्धती

**(समर्थ गांवकरी)**

भारतातील आर्थिक यंत्रणा विकसित होत आहे आणि ग्राहकांची व्यवहार करण्याची पद्धतही वेगाने बदलत आहे. युपीआय, कार्ड पेमेंट्सवर त्यांचा भर असून ई- कॉमर्स प्लॅटफॉर्म व रिटेल आउटलेट्सनाही ते पसंती देत आहेत. दागिन्यांची खरेदी असो, किंवा जीवनशैलीत नवे बदल करणं असो, प्रवासाचे बुकिंग करणे असो किंवा इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सची माहिती मिळवणे असो, ग्राहक सातत्याने ई- कॉमर्स आणि रिटेल पातळीवर सर्वोत्तम डील्सच्या शोधात असतात. डिजिटल- फर्स्ट सुविधेला ग्राहकांची वाढती पसंती मिळत असून तत्काळ व्यवहार करण्याचा सोपेपणा त्यांच्या खर्च करण्याच्या मानसिकेतला आकार देत आहे. मूल्याच्या बाबतीत ईकॉमर्सचे वर्चस्व असून सप्टेंबर 2025 मधे एकूण क्रेडिट कार्ड खर्चाचा त्यातील वाटा 66.4 टक्के (स्त्रोत -ET BFSI.) होता. युपीआय, क्रेडिट कार्ड्स आणि डिजिटल वॉलेट्ससारख्या डिजिल पेमेंट्स पद्धतींचा वापर वाढत असून ग्राहकांनी ऑनलाइन व्यवहार करताना, विविध ऑफर्स आणि डील्सचा सर्वाधिक वापर करताना जागरूक राहणे महत्त्वाचे झाले आहे आणि तरच त्यांना सफाईदार पेमेंट पद्धतीचा आनंद घेता येईल.

## जिद्द, परिश्रम, सातत्य, संगत आणि शिस्त यशस्वी होण्यात महत्त्वाचे

*क्रिकेटपटू केदार जाधव यांचा सल्ला; बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे बांधकाम कामगारांच्या गुणवंत मुलांचा सत्कार*

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"राज्याच्या कामगार विभागाअंतर्गत कल्याणकारी मंडळ कार्यरत आहे. कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांसाठी आणि त्यांच्या पाल्यांसाठी विविध कल्याणकारी योजना आहेत. त्या योजनांचे लाभार्थी होण्यासाठी बांधकाम कामगारांनी कल्याणकारी मंडळात नोंदणी करावी आणि योजनांचा लाभ घ्यावा," असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त दत्तात्रेय पवार यांनी केले. याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रसिद्ध क्रिकेटपटू केदार जाधव यांनी जिद्द, परिश्रम, सातत्य, संगत आणि शिस्त पाळण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे सेंटरतर्फे बांधकाम कामगारांच्या गुणवंत मुलांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. शनिवार पेठेतील विष्णुकृपा हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात क्रिकेटपटू केदार जाधव, सहायक कामगार आयुक्त दत्तात्रेय पवार, प्रेरक वक्ते समृद्धी जाधव,'बीएआय'चे अध्यक्ष अजय गुजर, उपाध्यक्ष राजाराम हजारे व महेश मायदेव, कोषाध्यक्ष महेश राठी, बीएआयचे महाराष्ट्र अध्यक्ष जगन्नाथ जाधव, सचिव मनोज देशमुख, माजी अध्यक्ष सुनील मते आदी मान्यवर उपस्थित होते. दत्तात्रेय पवार म्हणाले, "कामगारांच्या पुढच्या पिढ्यानी उत्तम शिक्षण घेऊन करिअर घडवण्यासाठी प्रोत्साहन देणारा हा कौतुक सोहळा स्तुत्य आहे. कामगारांनी आपल्या नावाची पुराव्यासह नोंदणी कामगार विभागाच्या कल्याणकारी मंडळात केल्यास, अनेक योजनांचा लाभ त्यांना मिळू शकेल. विशेषतः कामगारांच्या पाल्यांसाठी, शिक्षणासाठी अनेक योजना आहेत. मात्र, कामगार नोंदणी करत नसल्याने त्याचा निधी शिल्लक राहतो.




## एण्ड टीव्हीवरील अभिनेत्रींनी हिवाळ्यामध्ये दररोज त्यांच्या बॅगेमध्ये आवश्यक असलेल्या वस्तूंबाबत सांगितले!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

हिवाळा आला असताना एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री उबदार कपडे व पेयांसह ऋतूचे स्वागत करण्यास सज्ज आहेत, तसेच बॅगेमध्ये आवश्यक वैयक्तिक वस्तू ठेवत आहेत, ज्या त्यांना आरामदायी आणि कॅमेऱ्यासमोर सुसज्ज राहण्यास मदत करतात. आवश्यक स्किनकेअरपासून आकर्षक ॲक्सेसरीज व अर्थपूर्ण सवयींपर्यंत सीरत कपूर (सावी, घरवाली पेडवाली), गीतांजली मिश्रा (राजेश, हप्पू की उलटन पलटन) आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, भाबीजी घर पर हे) त्यांना हिवाळ्यामध्ये दीर्घकाळापर्यंत शूटिंग करताना सुसज्ज राहण्यास मदत करणाऱ्या वस्तूंबाबत सांगत आहेत. आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील सीरत कपूर ऊर्फ सावी म्हणाल्या, हिवाळ्यामध्ये माझ्या बॅगेमध्ये काही वस्तू असतात, ज्या दिवसभर माझ्या त्वचेचे संरक्षण करण्यास मदत करतात. मी नेहमी सोबत हायड्रेटिंग मॉइश्चरायझर, आकर्षक लिप बाम आणि उत्साहवर्धक फेशियल मिस्ट ठेवते, कारण दीर्घकाळापर्यंत शूटिंग करताना माझी त्वचा खूप कोरडी होते. मी सोबत मऊ स्कार्फ देखील ठेवते, शूटिंग थांबली



असताना माझ्या चेहऱ्याला स्कार्फसह झाकते, ज्यामुळे त्वरित उत्साही होण्यास मदत होते. तसेच माझ्या बॅगेमध्ये काही हर्बल टीचे पॅक्स देखील असतात. ऊर्जा कमी वाटल्यास किंवा थंडी वाजत असल्यास मी गरमागरम हर्बल चहा बनवून पिते आणि मला आतून उत्साहित वाटते. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, हिवाळ्यामध्ये माझ्या बॅगेमध्ये काही वस्तू असतात. प्रथम म्हणजे मी नेहमी हँड क्रीम सोबत ठेवते, कारण हिवाळ्यामध्ये सतत मेकअप व वारंवार स्वच्छ करावे लागत असल्यामुळे माझे हात कोरडे होतात. मी मऊ मफलर, टिशू पेपर आणि काही स्नॅक जसे बदाम किंवा अक्रोड देखील सोबत ठेवते, ज्यामुळे मला सेटवर त्वरित ऊर्जा मिळते. शूटिंगदरम्यान आरामदायी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे, म्हणून मी उपयुक्त ठरणाऱ्या वस्तू सोबत ठेवते. थंडीच्या दिवसात माझ्या बॅगेमध्ये लहान गरम पाण्याने भरलेली बॉटल देखील असते आणि ती खूप कामी येते. मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, हिवाळ्यामध्ये माझ्या बॅगेत आवश्यक वस्तू असतात, ज्या मला उबदार, ताजेतवाने आणि शूटिंगसाठी सुसज्ज ठेवतात. विशेषत: बाहेर शूटिंग करत असताना थंडीचा त्रास होण्याची शक्यता असल्यामुळे मी माझ्या बॅगेममध्ये उबदार मोजे ठेवते. त्यासोबत कोमट पाण्याने भरलेली स्टेनलेस स्टील बॉटल देखील असते, कोमट पाणी प्यायल्याने माझा घसा व शरीराला आराम मिळतो. मी दिवसभर ताजेतवाने वाटण्यासाठी सोबत सौम्य परफ्यूम रोल-ऑन देखील ठेवते. या साध्या वस्तू हिवाळ्यामध्ये शूटिंग करणे सोपे करतात आणि मला उत्साही करण्यासोबत ऊर्जा देतात. पहा तुमच्या आवडत्या मालिका दर सोमवार ते शुक्रवार, मालिका हप्पू की उलटन पलटन रात्री 10 वाजता, भाबीजी घर पर है रात्री 10.30 वाजता आणि घरवाली पेडवाली लवकरच फक्त एण्ड टीव्हीवर!

## वसुंधरा अकॅडेमीची समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत विजयी भरारी

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

राजूर येथे राघोजी भांगरे जयंती उत्सवात अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांनी गायिलेल्या देशभक्तीपर क्रांतीगीताने सर्वांची मने जिंकली. दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी राजूर येथे आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे जयंती उत्सवानिमित्त या स्पर्धा संपन्न झाल्या. या प्रसंगी वसुंधरा अकॅडेमी, अकोले येथील विद्यार्थ्यांनी सप्तसुरांची उधळण करीत क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या जीवनावर आधारित देशभक्तीपर गीत सादर केले. त्यांच्या सुरेल आवाजाने आणि उत्कृष्ट वाद्यवृंद साथीने संपूर्ण प्रांगणात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय समूह गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा आणि तालुक्याचा अभिमान वाढविला. विजेत्या विद्यार्थ्यांना तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रू.१५००० आणि चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत वसुंधरा अकॅडमीच्या दिग्विजय विक्रम नवले, समर्थ रामदास खामकर, साई गणेश नाईकवाडी, राजदीप सचिन शेटे, ध्रुवराज देवदत्त शेटे, समर्थ अंकुश कोल्हाळ, निशांत सुदाम सोनवणे,दिव्यांश सुमित शेळके, निषाद नवनाथ साबळे, देवांश शिवाजी आवारी, सक्षम तानाजी नवले, कस्तुरी दिपक राऊत, आराध्या अंकुश मुतडक, निधी ललितकुमार आवारी, मरियम फातिमा शफिक शेख, गायत्री विशाल देशमुख, सायली योगेश देशमुख, सिद्धी अविनाश देशमुख, अलंकृता गणेश काळे, ऋतिका संतोष साबळे, समृद्धी रणजीत देशमुख, श्रद्धा चंद्रभान लांडगे, आराध्या नेताजी आरोटे, विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आणि विद्यार्थ्यांच्या उत्तम तयारीमागे संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ सर यांचे परिश्रम व मार्गदर्शन मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर, प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले सहसचिव तथा प्राचार्य अल्फोन्सा. डी, उपप्राचार्या राधिका नवले, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या समर्पणाचे कौतुक केले.



# मंचर प्रभाग 13 ते 15 मध्ये वाहतूक कोंडी, स्वच्छतेचा अभाव आणि भीतीचे सावट

**मंचर (समर्थ गांवकरी)**

मंचर नगरपंचायतीच्या अंतर्गत येणारे प्रभाग क्रमांक १३, १४ आणि १५ हे शहरातील सर्वाधिक गर्दीचे आणि व्यापारी दृष्ट्या महत्वाचे मानले जातात.या प्रभागात बाजारपेठेचा काही भाग, लक्ष्मी रस्ता, नगरपंचायत परिसर, मार्केट यार्ड, टेलिफोन एक्सचेंज आणि मुळवाडी रस्ता या प्रमुख वर्दळीच्या भागांचा समावेश होतो.मात्र, या भागात नागरिकांना वाहतूक कोंडी, स्वच्छतेचा अभाव आणि सुरक्षेच्या दृष्टीने निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाचा एकत्रित




त्रास सहन करावा लागत आहे.

दररोज सकाळी आणि संध्याकाळी मार्केट परिसरात वाहनांची गर्दी, अतिक्रमण आणि पार्किंगची समस्या तीव्र होते. वाहतूक नियंत्रणासाठी पुरेशा पोलिसांची किंवा स्वयंसेवकांची व्यवस्था नसल्याने पादचारी व शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागतं. तसेच या भागात स्वच्छता गृहांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे.यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नगरपंचायतीच्या माध्यमातून या परिसरात सिमेंट रस्ते, पिण्याचे पाणी, ड्रेनेज यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी लोकसंख्येच्या तुलनेत त्या अपुऱ्या ठरत आहेत.परिसरात असंख्य सदनिका असून, काही ठिकाणी वेळेवर कचरा उचलण्यासाठी गाडी येत नसल्याची तक्रार महिलांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे दुर्गंधी आणि अस्वच्छतेचं वातावरण निर्माण होत आहे.याशिवाय, पथकर दिवे बसवलेले असले तरी अनेक ठिकाणी लाईट बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचं साम्राज्य असतं. या भागात अलीकडच्या काळात बिबट्याच्या वावराच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे स्थानिकांनी या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच रात्री गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे.नागरिकांच्या मते, मंचर नगरपंचायतीने मूलभूत सुविधा पुरवल्या असल्या तरी वाढती लोकसंख्या आणि अपुरी देखभाल यामुळे समस्यांचा भडका उडाला आहे. शहराच्या मध्यवर्ती या प्रभागात तातडीने वाहतूक व्यवस्थापन, स्वच्छता सुधारणा, आणि सुरक्षेची उपाययोजना न झाल्यास नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. प्रभागनिहाय आरक्षण:नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग( महिला)-प्रभाग क्र.१३,मतदार- एकूण-९१९,पुरुष-४६५ , महिला-४५४. प्रभागाची व्याप्ती-उत्तर-डॉ. काजळे हॉस्पिटल,पूर्व-समर्थ कॉम्पलेक्स,अमोल फ्लेक्स,दक्षिण- पराग पतसंस्था, लक्ष्मी रोड,पश्चिम-नगरपंचायत इमारत.

प्रभागनिहाय आरक्षण:नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग( महिला)-प्रभाग क्र.१४,मतदार- एकूण-९७५,पुरुष-५११, महिला-४६४. प्रभागाची व्याप्ती-उत्तर-नगरपंचायत इमारत,पूर्व-टेलिफोन एक्सचेंज,दक्षिण-अभिनव प्राईड गावडे वकिल,पश्चिम-समाधान हॉटेल.प्रभागनिहाय आरक्षण : सर्वसाधारण (महिला)-प्रभाग क्र.१५,मतदार-एकूण-१११५, पुरुष-५४३,महिला-५७२. प्रभागाची व्याप्ती-उत्तर-टेलिफोन एक्सचेंज,पूर्व- सोपान बाणखेले घर,दक्षिण-खेडकर हॉस्पिटल,पश्चिम-

## थोडक्यात बातम्या...



### भाऊसाहेब वाघ यांचे निधन

**मंचर (स. गांवकरी) :** रांजणी ता.आंबेगाव येथील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब धोंडीबा वाघ वय ९७ यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले,चार मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.भाऊसाहेब वाघ यांनी तंत्रशुद्ध शेती करून अनेक होतकरू तरुणांना शेती संदर्भात मार्गदर्शन केले. आंबेगाव तालुका शेतमाल प्रक्रिया संस्थेचे अध्यक्ष सतीश रोडे पाटील यांचे ते सासरे होत.



### वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून वाढदिवस साजरा

**नांदेड (स. गांवकरी) :** वाढदिवसानिमित्त होणारा अवाढव्य खर्च टाळून येथील सामाजिक कार्यकर्ते पवन शेठ यादव यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीन कौठा शाळेत शालेय साहित्य वाटप करत वाढदिवस साजरा करण्यात आला. आजच्या आधुनिक युगात वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धती बदलत असताना नांदेड येथील पवन शेठ गुरुखुदे यादव या व्यावसायिक तरुणाने समाजापुढे एक नवा आदर्श ठेवला आहे. पवन शेठ यांनी वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून त्यांनी जिल्हा परिषद नांदेड या ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून आपला वाढदिवस अत्यंत साधेपणाने आणि अर्थपूर्णरित्या साजरा केला. या आदर्श वाढदिवस सोहळ्याचे आयोजन केला येथील जिल्हा परिषद शाळेत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कौठा प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते पवन शेठ यादव यांचे शाल पुष्पहार देऊन आदराने अभिष्टचिंतन करण्यात आले. यानंतर पवन शेठ यादव यांच्या हस्ते शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले हा उपक्रम पाहून उपस्थितांनी पवन शेठ यांच्या सामाजिक जाणीवेचे कौतुक केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पवन शेठ यादव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून वॉर्ड क्र १९ चे सक्रिय सामाजिक कार्यकर्ते सुनील अंनतवार, संतोष कडपे, सामाजिक कार्यकर्ते जळबा सोनकांबळे, खंडू धोंगडे, भैय्यासाहेब दुंडे, अंबादास शिरसाठ बापूराव पाईकराव, शिवा धोंगडे यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांच्या सूचनेनुसार वायफळ खर्च न करता सामाजिक उपक्रम राबवण्याचे आदेश दिले असून नांदेड दक्षिणचे सप्तरंगी साहित्य मंडळाची युवा आघाडी व महिला आघाडी हे प्रज्ञाधर ढवळे यांच्या सूचनेच पालन म्हणून सामाजिक उपक्रम राबवण्यात आला होता. सप्तरंगी साहित्य मंडळ व सर्व टीमने केलेल्या या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमाचे परिसरातून विशेष कौतुक होत आहे. या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन नवयुवक भीम जयंती मंडळ व सप्तरंगी साहित्य मंडळ नवीन कौठा नांदेड.यांच्या संयुक्त विमानाने करण्यात आला होता.

### पुण्यात ऑक्टोबर २०२५ मध्ये १२,५०० पेक्षा जास्त मालमत्ता नोंदणी

**पुणे (स. गांवकरी) :** नाईट फ्रँक इंडियाने त्यांच्या नवीनतम मूल्यांकनात अहवाल दिला की, पुणे रिअल इस्टेट बाजारामध्ये ऑक्टोबर 2025 मध्ये 12,693 मालमत्तांची नोंदणी झाली असून, यामुळे मुद्रांक शुल्क संकलन ₹527 कोटींवर पोहोचले. नोंदणीमध्ये 39% वार्षिक घट झाली, तर महसूल संकलन 30% ने घटले. याचे मुख्य कारण उच्च आधार हे आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये नवरात्री (3-11 ऑक्टोबर) आणि दिवाळी (1 नोव्हेंबर 2024) मुळे जोरदार सणासुदीची गती दिसून आली होती. याउलट, या वर्षीची सणासुदीची प्रवृत्ती प्रामुख्याने सप्टेंबरमध्ये केंद्रित होती, कारण नवरात्री 22 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या काळात होती आणि केवळ दिवाळी (20 ऑक्टोबर) ऑक्टोबरच्या सणासुदीच्या गतीला हातभार लावत होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत आकडे कमी असले तरी, ते 12,000 च्या पुढे राहून चांगल्या मर्यादेत होते. मासिक आधारावर, नोंदणीमध्ये 6% घट झाली, तर मुद्रांक शुल्क संकलनात माफक 0.7% वाढ दिसून आली. शिशिर बैजल, चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक, नाईट फ्रँक इंडिया म्हणाले, “पुण्याच्या गृहनिर्माण बाजारपेठेने 2025 मध्ये आपला आधार मजबूतपणे टिकवून ठेवला आहे. गेल्या वर्षीच्या सणांमुळे-फुगलेल्या आधारापेक्षा ऑक्टोबरचे आकडे कमी असले तरी, शहराने 12,600 हून अधिक नोंदणी केली आणि ₹500 कोटींहून अधिक महसूल मिळवला, जो स्थिर अंतर्निहित मागणी दर्शवतो. यावर्षी सणासुदीची बरीच खरेदी सप्टेंबरमध्ये हस्तांतरित झाली, पण ऑक्टोबरमधील व्यवहार निरोगी मर्यादित राहिले. गेल्या चार वर्षांतील सर्वाधिक वर्ष-ते-दिनांक नोंदणी आणि महसूल पाहता, पुणे सातत्याने, टिकाऊ व्हॉल्यूमवर कार्य करत आहे, जे बाजारपेठ अधिक सुसंगत, व्यापक-आधारित आणि आत्मविश्वासाने वाढल्याचे दर्शवते.” घरांच्या आकारावरील एकूण पसंती वर्षभर स्थिर राहिली आहे. 500 चौ. फूटपेक्षा कमी आकाराच्या घरांचा वाटा 22% वरून 23% पर्यंत वाढला, तर 500 ते 800 चौ. फूट या श्रेणीने 46% वाट्यासह स्थिरता राखली. 800 चौ. फूटपेक्षा मोठ्या घरांच्या श्रेणीत किंचित घट झाली असून, वाटा 32% वरून 30% पर्यंत घसरला आहे. यावरून दिसते की मोठ्या घरांच्या मागणीत स्थैर्य असूनही किंचित मृदुता दिसत आहे. ऑक्टोबर 2025 मध्ये हवेली तालुका, पुणे महानगरपालिका (PMC) आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) यांचा समावेश असलेल्या मध्य पुण्याने निवासी व्यवहारांमध्ये आपले आघाडीचे स्थान कायम राखले, आणि 64% बाजारातील वाटा नोंदवला.

## टाईप 5 डायबेटिसवर अधिक संशोधन गरजेचे : लँसेटमधील प्रकाशित शोधनिबंधाचा निष्कर्ष

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कुपोषण किंवा अल्प पोषणामुळे मधुमेह होऊ शकतो का? त्याची नेमकी कारणे आणि योग्य उपचार समजण्यासाठी अधिक संशोधन व दस्ताऐवजीकरण गरजेचे आहे,याकडे लँसेंट मध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या शोधनिबंधाने लक्ष वेधले आहे. केईएम हॉस्पिटल पुणे येथील डायबेटिस युनिटचे प्रमुख डॉ.चित्तरंजन याज्ञिक हे या शोधनिबंधाच्या लेखकांपैकी एक आहेत.

जानेवारी 2025 मध्ये भारतात वेल्लोर येथे विविध देशांमधून आलेल्या तज्ञांची बैठक झाली. टाईप 1 आणि टाईप 2 या सामान्यपणे आढळणाऱ्या मधुमेह प्रकारांशिवाय दुर्मिळ अनुवंशिक आणि इतर दुय्यम मधुमेह प्रकारांपासून याची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी याला टाईप 5 डायबेटिस असे म्हटले गेले आणि यावर संमती झाली.याचा मूळ उद्देश्य मधुमेहाशी संबंधित सर्व भागधारकांचे लक्ष वेधून पुढील संशोधनाला प्रोत्साहन देणे होते.

जगप्रसिध्द संशोधक व केईएम हॉस्पिटल पुणे येथील डायबेटिस युनिटचे प्रमुख डॉ.चित्तरंजन याज्ञिक म्हणाले की,मधुमेह (टाईप 2) हा सहसा अतिपोषणाशी जोडला जातो.परंतु गेल्या 75 वर्षांत वारंवार असे नोंदवले गेले आहे की,अनेक मधुमेही हे अतिपोषित किंवा लठ्ठ नसतात.विशेष करून विकसनशील देशांमध्ये हे दिसून येते.अशी लोकं सामान्य वजनाची,सडपातळ किंवा कमी वजनाची असतात.याचे वर्णन याआधी कुपोषण संबंधित मधुमेह असे केले गेले आहे.हे वर्णन प्रामुख्याने उष्ण कटिबंधीय प्रदेशांच्या बाबतीत केले गेले आहे. त्यामध्ये आफ्रिका,जमैका,भारत यासारख्या अनेक शतके गरीब आणि आता विकसनशील देशांचा समावेश आहे.

मधुमेह हा एक गुंतागुंतीचा आजार असून यामध्ये अनुवंशिक व पर्यावरणीय घटक कारणीभूत ठरू शकतात. दुर्मिळ अनुवंशिक प्रकार मोठ्या प्रमाणावर उत्परिवर्तनामुळे होतात.पण अनेकदा माफक अनुवंशिक जोखमीचे घटक आणि लक्षणीय पर्यावरणीय उत्तेजित घटकांमुळे होऊ शकते.

टाईप 1 डायबेटिस (टीआयडी) या स्थितीमध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती स्वादुपिंडामधील इन्शुलिन उत्पादक बीटा पेशींवर हल्ला करतात. त्यामुळे शरीरात इन्शुलिनची कमतरता निर्माण होते किंवा इन्शुलिन तयार होत नाही.टाईप 1 मधुमेह हा बहुतांश वेळेस लहान मुले किंवा किशोरवयीन मुलांमध्ये आढळतो.टाईप 1 चे एकंदर मधुमेह रूग्णांमध्ये प्रमाण हे 5 टक्क्यांपेक्षा कमी आहे.सर्वांत सामान्यपणे आढळणारा प्रकार हा टाईप 2 असून याचे प्रमाण 90 टक्क्यांपेक्षा जास्त आहे व यामध्ये अनेक अनुवंशिक आणि पर्यावरणीय घटक यामधील परस्पर संवादाचा परिणाम आहे.यात पर्यावरणीय घटकाचा प्रभाव जास्त असतो.

नव्याने नोंद होत असलेल्या पुराव्यांमध्ये निदर्शनास येत आहे की,मातेचे पोषण कमी असणे, ताण-तणाव,लठ्ठपणा किंवा शरीरास हानिकारक पदार्थ अशा गर्भाशयातील परिस्थितीमुळे अर्भकाच्या अवयवांच्या विकासावर परिणाम करू शकतात आणि मधुमेहाची जोखीम वाढू शकते. जन्माला येणाऱ्या बालकाचे वजन कमी किंवा जास्त या दोन्ही परिस्थितीत जोखीम वाढवू शकते.भारतीय बाळांचे जन्माला येताना सरासरी वजन हे जागतिक स्तरावर सर्वांत कमी असते आणि त्यामुळे जोखीम वाढते. नंतरच्या आयुष्यात चुकीची जीवनशैली,निष्क्रियता,ताण-तणाव,झोपेचा अभाव यामुळे मधुमेहाची जोखीम आणखी वाढते.तरूण भारतीयांमध्ये कमी बीएमआय स्थितीत देखील मधुमेहाचा धोका जास्त असतो.याचे कारण गर्भावस्थेत अल्प पोषणामुळे उद्भवणारे एक विशिष्ट शरीर प्रकार ज्याला थिनफॅट असे संबोधले गेले आहे.जन्माला येताना कमी वजन आणि नंतरच्या आयुष्यात लठ्ठपणा ही सर्वांत टाईप 2 मधुमेहासाठी सर्वात जोखीमकारक स्थिती आहे. महिलांमध्ये यामुळे गर्भावस्थेत मधुमेहाचा धोका देखील वाढतो व यामुळे बाळांमध्ये मधुमेहाची जोखीम वाढते. विविध प्रकारच्या अनुवंशिक व पर्यावरणीय घटकांमुळे टाईप 2 मधुमेह हा अत्यंत विषम आहे.यात देखील उपप्रकार ओळखण्याची प्रक्रिया ही स्वीडन मध्ये सुरू झाली आणि भारतात पुणे आणि चेन्नईमध्ये आपल्या देशातील उपप्रकाराचे वर्णन केले गेले.स्वीडन येथील रूग्णांच्या तुलनेत भारतातील (पुणे,अहमदाबाद व आसाम) च्या उपप्रकारांची तुलना केल्यास असे दिसून येते की,भारतातील 2/3 रूग्ण हे शरीराने बारीक असून इन्शुलिनची कमतरता असलेल्या प्रकारांमध्ये आहेत.

## अहिल्यानगरचा डंका वेदमूर्ती देवव्रत यांच्या रूपात साक्षात बृहस्पती

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील श्रुती स्मृती ज्ञान मंदिर वेद पाठशाळेचे संस्थापक घनपाठी महेश चंद्रकांत रेखे यांचे चिरंजीव वेदमूर्ती देवव्रत रेखे यांचे श्रीक्षेत्र काशी येथे 12 ऑक्टोबरपासून चालू असलेल्या दण्डक्रम पारायण सोहळा पाहण्यासाठी आणि त्यांच्या मुखाद्वारे कंठस्थ श्लोकाचे श्रवण करण्याकरिता संपूर्ण भारतातून अनेक ज्येष्ठ, युवा वेदमूर्ती काशी येथे उपस्थित राहून, युवा वेदमूर्ती देवव्रत्त यांच्या दण्डक्रम पारायणाचे कौतुक करीत आहेत. केवळ 19 वर्षीय देवव्रत रेखे यांनी यजुर्वेदातील हजारो ऋचा (श्लोक) प्राचीन गुरुकुल अध्ययन परंपरेप्रमाणे कंठस्थ केले आहे. या सर्व श्लोकांचा सरळ व पुन्हा उलटा श्लोक म्हणणे; तेही अर्थ न बदलता अशा प्रकारे सुमारे साडेपाच लाख श्लोकांचे आवर्तन त्यांनी आजपर्यंत केले आहे. दररोज पाच तास हे पारायण चालू असून 30 नोव्हेंबर 25 अखेर ते पूर्ण होणार आहे. भारतातील प्राचीन संस्कृती केंद्र काशी येथे आजपर्यंत असे कंठस्थ दंण्डक्रम पारायण झालेले नाही. इतिहासामध्ये चिरंजीव देवव्रत महेश रेखे यांच्या पारायणाची नोंद अग्रक्रमाने घेतली जाईल.

## कांदा मोठ्या प्रमाणात सडल्याने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

कांदाचाळीत साठवलेला कांदा शेतकरी पिशवीमध्ये भरून बाजारात पाठवत आहेत. परंतु बाजार भाव नसल्याने आणि कांदा मोठ्या प्रमाणात सडल्याने भांडवली खर्चही निघत नसल्याने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात आहे.

मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन घेतले जाते.हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणामुळे, घोडनदीला बारमाही पाणी राहते. त्याचप्रमाणे डिंभा उजवा व डावा कालवा यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर पाण्याची उपलब्धता आहे.त्यामुळे कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते.मे महिन्यापासून कांदा सहा




महिने झाले तरी पुरेसा बाजारभाव नसल्याने बराखीत पडून आहे. सध्या कांद्याचे बाजारभाव पडले असून 13 ते 14 रुपये प्रति किलो असा बाजारभाव चांगल्या कांद्याला मिळत आहे.परंतु खराब झालेल्या बदला कांद्याला चार ते पाच रुपये बाजारभाव मिळत आहे.कांदा पिक चार महिन्याचे दिसत असले तरी वस्तूस्थिती कांदा पिक हे 12 ते 13 महिने शेतकऱ्यांना सांभाळावा लागतो.त्यामुळे एकंदरीतच कांदा पीक हे पूर्ण एक वर्षभराचे होते.बियाणे टाकल्यापासून एकंदरीतच कांद्याचा होणारा भांडवले खर्च व मिळणारे उत्पन्न यात मोठे तफावत असून शेतकरी वर्ग कांदा पिक पुढच्या वर्षी करायचे नाही या मनस्थिती येऊन ठेपला आहे.एकंदरीतच सध्या तरी कांदा शेतकऱ्यांना रडवत असल्याचे समोर येत असून सध्या पडलेला बाजारभावाने शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे.

## बिबट्यांच्या भीतीच्या छायेत ऊसतोडणी

- मजुरांचे जगणे धोक्यात, बालकांवरही संकटाचे सावट

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यासह जिल्ह्यात ऊसतोडणीला वेग आला आहे. मात्र या हंगामात उसाचे क्षेत्रच बिबट्यांचे माहेरघर बनले असून ऊसतोडणी कामगार अक्षरशः मृत्यूच्या छायेत काम करत आहेत.ऊसतोडणी फडात काम करणारे मजूर आपल्या कुटुंबासह, लहान बालकांसह या



बिबट्यांच्या अधिवासात राहत असल्याने भीतीच्या छायेखाली वावरत आहे. संध्याकाळ होताच अंधार पसरतो आणि त्या अंधारात बिबट्याची चाहूल लागण्याची भीती प्रत्येक क्षणी त्यांना जाणवते. ऊसतोडणीच्या जागी त्यांनी उसाच्या पाचटाची झोपडी उभारून त्याच ठिकाणी संसार मांडला आहे. काही महिलांच्या साडीच्या झोक्यात बाळं झोपलेली असतात, तर काही लहान मुले ऊसाच्या गंजीत खेळत असतात. त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी कोणीही कायम उपस्थित नसतं.तरीही या कुटुंबांना काम थांबवता येत नाही.कारण हा त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे. बिबट्यांचा उपद्रव, सर्पाचा धोका आणि अंधारात दडलेले संकट या सर्वांशी लढत ऊसतोडणी मजूर रोज नवी लढाई लढतात. महिलांना रात्री झोपही लागत नाही. त्यांच्यासाठी प्रत्येक आवाज म्हणजे

“ऊस तोडणी उदरनिर्वाह आहे, पण त्याच उसाच्या फडात बिबट्या दबा धरून बसतो. काम थांबवलं तर पोटाला भाकरी नाही, आणि काम केलं तर जीवाची भीती – हाच ऊस तोडणी कामगारांचा संघर्ष.” **धोंडीभाऊ भोर.ऊस उत्पादक शेतकरी वळती.**

भीतीचं द्योतक ठरतं.ऊसतोडणी कामगारांच्या टोळ्यांमध्ये लहान मुलांची संख्या मोठी आहे. या बालकांचं सुरक्षिततेचं प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. बिबट्याच्या हल्ल्याची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर आहे.

## कागदपत्र अपलोड करण्याची आवश्यकता नाही

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरणे आवश्यक आहे. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत (प्रिंटआऊट) घेवून व त्यावर सही करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे, असे स्पष्टिकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

राज्यातील 246 नगरपरिषदा व 42 नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे.

## पुण्यात इन्फ्युजन नर्सेस सोसायटी ऑफ इंडियाच्या १३व्या वार्षिक परिषदेचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आरोग्यसेवा क्षेत्रात प्रगत तंत्रज्ञान आणि रक्तवाहिन्यांसंबंधी आधुनिक उपकरणे व पध्दती येत असताना मानवी स्पर्श, वैद्यकीय उत्कृष्टता आणि परिचारिकांचे नेतृत्व हे दर्जेदार आरोग्यसेवेचे आधारस्तंभ असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले.

इन्फ्युजन नर्सेस सोसायटी ऑफ इंडिया (आयएनएस) पुणे चॅप्टर आणि नोबल हॉस्पिटल्स यांच्या संयुक्त विद्यमाने 7 व 8 नोव्हेंबर 2025 रोजी सुझलॉन वन अर्थ येथे 13 व्या वार्षिक आयएनएस परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. लाईन्स ऑफ केअर,लाईफलाईन्स ऑफ चेंज : अॅडव्हान्सिंग इनफ्युजन प्रॅक्टीस फॉर रेझिलियंट टुमारो




ही या परिषदेची संकल्पना होती. या परिषदेचा उद्देश्य इनफ्युजन केअरला चालना देणे, परिचारिका क्षेत्रातील उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणे आणि शिक्षण व इनफ्युजन नर्सिंगमधील नवकल्पनांवर चर्चा करणे हा होता. या परिषदेत 500 हून अधिक परिचारिका प्रत्यक्षरित्या आणि 2000 हून अधिक परिचारिका ऑनलाईन सहभागी झाल्या होत्या. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे कमांडंट ऑफ आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजचे संचालक व लेफ्टनंट जनरल पंकज पी.राव, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या रजिस्ट्रार डॉ.अर्चना बधे, राज्य आरोग्य नर्सिंग विभागातील आरोग्य सेवा उपसंचालक डॉ.निलिमा सोनावणे यांसह कन्सॉर्टियम ऑफ ॲक्रिडिएटेड हेल्थकेअर ऑर्गनायझेशन्सचे अध्यक्ष डॉ.विजय अगरवाल, नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने, रूबी हॉल क्लिनिकच्या व्यवसाय धोरण आणि कामकाज विभागाच्या सरव्यवस्थापक नताली ग्रांट आदी मान्यवर उपस्थित होते. आयोजन समितीमध्ये इन्फ्युजन नर्सेस सोसायटी ऑफ इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कोलोनेल बीनू शर्मा,उपाध्यक्ष कोलोनेल मधुकरी रे,राष्ट्रीय सचिव कॅप्टन संध्या शंकर,आयोजन समितीच्या अध्यक्ष तृप्ती नंदा आणि सहअध्यक्ष आर्या कुलकर्णी व डॉ.श्रीलेखा राजेश यांचा समावेश होता.

कोलोनेल बीनू शर्मा हे या परिषदेमागच्या दूरदर्शी नेतृत्व आणि मार्गदर्शक शक्ती आहेत. रूग्ण व्यवस्थापनामधील सर्वात महत्त्वाच्या पैलूंपैकी एक असलेल्या इन्फ्युजन थेरपीसाठी केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे तर,जागरूकता,सहानुभूती आणि सातत्याने कौशल्य विकसित करणे देखील आवश्यक असल्याचे तज्ञांनी सांगितले.

कमांडंट ऑफ आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजचे संचालक व लेफ्टनंट जनरल पंकज पी.राव म्हणाले की, इन्फ्युजन थेरपी ही सर्वात सामान्यपणे वापरली जाणारी प्रक्रिया असली तरी रूग्ण सेवेच्या बाबतीत अतिशय महत्त्वाची प्रक्रिया आहे आणि रूग्ण परिणामांवर प्रभाव पडतो.शिरांमधून द्रव पदार्थ शरीरात टाकण्यासाठी विविध उपकरणांचा वापर,संक्रमणांपासून प्रतिबंध आणि सुरक्षा पध्दती सुनिश्चित करत रूग्ण बरे होण्यामध्ये मदत करणे ही एक आव्हानात्मक बाब आहे.